
पाणीवाली ! मिलोवाली !





# माणूस

३१ मार्च १९७३

पन्नास पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

३१ मार्च १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा – अंक : त्रेचाळीस

**सप्रेम नमस्कार...**

३ मार्चच्या ' माणूस 'अंकातील माझे वार्तापत्र प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या घटना घडल्या त्या खालीलप्रमाणे—

१. ७ मार्च रोजी ' माणूस 'मधील माझे वार्तापत्र आ. मृणाल गोरेंनी (३ मार्चचे) पुरवठा मंत्र्यांच्या मागण्यावरील चर्चेत वाचून दाखविले. त्याला इतर दोन विरोधी पक्षीय आमदारांनी साथ दिली.

२. सदर वार्तापत्र मुंबईच्या आणि ठाणे जिल्ह्याच्या शासकीय वर्तुळात अतिशय खळबळजनक ठरले. ज्यांनी वारल्यांच्या जागेत जबरदस्तीने घरे बांधली होती, त्यांची घरे सरकारी खर्चाने पाडण्याचा आदेश वसई मामलेदाराला आला.

३. भाताची चोरटी वाहतुक करणाऱ्या पाटलावर कायदेशीर इलाज करण्यात आला. शिवाय त्यांचे मिलींग परमीट रद्द करण्यात आले. इतर चोरटी वाहतुक करणाऱ्यांची परमिटेसुद्धा रद्द करण्यात आली. साठेबाजां-वर राज्यपातळीवरून व जिल्हापातळीवरून धाडी घालण्यात आल्या.

आणि विशेष म्हणजे तीन मार्चचा माणूस ठाणे जिल्ह्यातील व मुंबई शहरातील कुठच्याही स्टॉलवर ४ मार्चपासूनच मिळणे मुष्कील झाले होते.

आपला

२३–३–७३ **प्रभाकर म्हात्रे**, मुंबई

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३०९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# धत्तुरा

## मुलाखत कसली ! एक स्वगतच

निळू दामले

मृणाल गोरेंची मुलाखत घेणे म्हणजे महा कर्मकठीण. त्यांच्याभोवती कायम माणसांचे कोंडाळे.

शेवटी विधानसभेपासून गोरेगावपर्यंत बसने जायचे आणि बसमध्येच मुलाखत घ्यायची ठरली. बसमधेही ओळखीची माणसे भेटतातच. नमस्कार, चमत्कार होतच राहतात.

'धत्तुरा आणि दुधाचे भाव ह्यावरच तुम्हाला मुलाखत हवी असणार' अशीच सुरुवात.

इकडला-तिकडला घोळ नाही, तेवढा वेळच त्यांना नसतो. सरळ विषयालाच एकदम धडक.

'माझे आणि भाऊसाहेब वर्तकांचे व्यक्तिगत भांडण नाही. परंतु ज्या बेपर्वाईने ते जनसामान्यांकडे पाहतात त्याची चीड येते. ह्यांना लोकांचे प्रश्नच समजून घ्यायचे नाहीत. समजले तर सोडवायचे नाहीत आणि सोडवावेसे वाटले तरी त्यांच्यात कुवत नाही.'

मृणालताईंची गाडी नॉन-स्टॉप सुरू.

'मिलोमधे धोत्र्याच्या विषारी बिया मिसळलेल्या आढळल्या म्हणून मी वर्तकांना धारेवर धरले. पण प्रश्न तेवढ्यापुरताच मर्यादित नाही. दुष्काळात सापडलेल्या ग्रामीण भागातल्या लोकांना आणि शहरातल्या गरीब लोकांना, सर्वांनाच चांगले आणि स्वस्त धान्य पुरवण्याची सरकारची जबाबदारी आहे. सरकार ती पार पाडत नाही. धान्य पुरेसे देत तर नाहीच, पण विषारी बियाही धान्याबरोबर द्यायला मागेपुढे पहात नाही, हे सरकार.'

—मुंबईत क्षयरोग्यांची संख्या १।। हजारावरून २७ हजारांवर गेली आहे. ही आहे नोंद झालेली आकडेवारी, इस्पितळापर्यंत पोचू न शकलेले क्षयरोगी अनेक पटींनी जास्त आहेत. शिरूर तालुक्यात २।। हजारांना रातांधळेपणा आल्याचे सिद्ध झाले आहे. सर्व महाराष्ट्रभर निकस अन्न-धान्य, जीवन-

त्यांची कमतरता यामळे लोकांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम हात आहे. हे माहीत असूनही केवळ आम्ही योग्य ती पावले उचलत आहोत एवढेच उत्तर मिळते. घाण्याच्या तेलाच्या किंमती वाढतच आहेत.

—एका बाजूला सरकारची धोरणात्मक दिवाळखोरी आणि दुसऱ्या बाजूला अंमलबजावणी न होणे ह्या पार्श्वभूमीवरच धत्तुरा मिश्रीत मिलोचा प्रश्न मी धसाला लावला.'

मिलो, धत्तुरा हे शब्द कानांवर पडल्यावर आसपासची पुस्तकात खुपसलेली दोन-तीन डोकी झटकन वर आली.

मुलाखत चालूच. मुलाखत कसली, सगळा एकतर्फीच मामला. प्रश्नांना फारसा वावच नाही.

—'वर्तकांच्या रहात्या घराजवळच्याच एका म्हाताऱ्या बाईने मला धत्तुरामिश्रीत मिलोची पिशवी आणून दिली आणि म्हणाली की, 'पहा आम्हाला कशी जनावरे समजतात.' मी स्वतः ३॥ किलो मिलो चाळला. त्यात अर्धा किलो धत्तुरा! उरलेला मिलोही पहावत नव्हता इतका खराब होता! शेकडो लोकांनी माझ्या घरी मिलोच्या पिशव्या आणि दुकानदारांची बिले आणून टाकली आहेत. तुम्ही घरी आल्यावर पहालच. पण वर्तक मात्र बेधडक आरोप करतात की, मी त्यांना केवळ सतावण्यासाठी कुठूनतरी त्या पिशव्या उचलून आणल्या. गोरेगावातल्या नव्हे तर त्यांच्याच गावातल्या लोकांनी मला नमुने आणून दिले आहेत.'

'तुम्ही व्यापाऱ्यांशी संगनमत करून हा बनाव घडवून आणलात असे वर्तक म्हणतात त्यावर...' मी.

माझे वाक्य पूर्ण व्हायच्या आतच त्या उसळून म्हणाल्या, 'हा वाह्यातपणा आहे धान्यपुरवठा सहकारी संस्थांना करण्याऐवजी तो कोण्या एका मेवजी छेडाला कसा झाला? काय कारणे होती? केली चौकशी? वर्तकांनी व्यापाऱ्यांशी संगनमताचे आरोप करताना स्वतःच्या पायाखाली काय आहे ते आधी पहावे आणि मगच आमच्यावर आरोप करावेत. उचलली जीभ लावली टाळ्याला हे वर्तकांना शोभून दिसत नाही. व्यापारी चांगले धान्य देतात की नाही हे पहाण्यासाठी आम्ही दक्षता समिती नेमतो आहोत. आम्हाला सरकारने ओळखपत्र द्यावे ही मागणी महिलांच्या समवेत आम्ही केली होती. आजतागायत वर्तकांनी ती मान्य केली नाही. लबाड व्यापाऱ्यांना पाठीशी घालायला उलट वर्तकच कारणीभूत हात आहेत.

गोरेगावात रस्ता रुंद करण्यासाठी आम्हीच केवळ एका रात्रीत सव्वाशेच्यावर दुकानदारांची जागा सरकारला मोकळी करून दिली. व्यापाऱ्यांच्या हितसंबंधाविरुद्धही जाऊन त्यांची मदत सामान्य माणसांच्या हितासाठी कशी घ्यावी हे धडे आम्हीच वर्तकांना देऊ शकतो. वर्तकांनी त्या गप्पा मारू नयेत.

विधान सभेतल्या चर्चेच्या दुसऱ्याच दिवशी वर्तकांनी मिलो दळून देणाऱ्या गिरण्यांना एक परिपत्रक पाठविले

'गिरण्यांनी मिलो चाळून घ्यावा. पण तरीही जर धोतऱ्याच्या बिया शिल्लक राहिल्याच तर जबाबदारी गिरण्यांवर राहणार नाही' असे त्या पत्रकात म्हटले होते. मग जबाबदारी कोणाची? गिरण्यांची नाही, सरकारची नाही, लोकांनी हवे तर विषबाधेने मरावे. आपल्यावर जबाबदारी न घेता बिनदिक्कतपणे लोकांच्या जीवनाशी क्रूर खेळ वर्तक आणि त्यांचे सरकार खेळू पहात आहे. चोर तो चोर वर... 'आम्ही तुमच्या मेहरबानीवर निवडून आलेलो नाहीत.' ही शिरजोरी करायला तयार.

—'विषारी मिलो देऊ नका' असे सांगताना तुम्हाला दुष्काळी लोकांना उपाशी मारायचे आहे. इतक्या हीन पातळीवरचा व विपर्यस्त असा आरोप वर्तक बेधडक करतात.

गरिबांची चेष्टा वर्तक करताहेत. फार निर्घृण अशा तऱ्हेने ते वागताहेत. त्यांची ही गुन्हेगारी बेपर्वाई पाहिल्यावर विधानसभेत मला स्वतःच्या संतापावर नियंत्रण ठेवणे कठीण होऊन बसले. विधानसभेचे सर्व नियम झुगारून देऊन मिलोच्या पिशव्या वर्तकांच्यावर फेकून माराव्यात असेच मला क्षणभर वाटले. मी नव्हे, त्यांच्याच मतदार संघातल्या लोकांनी जाहीरसभेत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. आणि आम्ही त्यांना आता चळवळ करून राजीनामा द्यायला लावणार आहोत. जनतेचा हिसका दाखविणार आहोत.'

बस स्टॉपवर थांबत होती. लोक चढत–उतरत होते. मृणालताईंना काहीच जाणवत नव्हते. त्यांचे बोलणे चालूच; घशाला त्रास होत होता तरीही.

'बोळींज गावात मी गेले होते तेथे लोक सांगत होते. कलेक्टर व सरकारी अधिकारी गावात आले. दमदाटी करून स्वच्छ मिलो मिळतो असा जबाब मागितला. लोकांनी दिला नाही. अस्वच्छ मिलोच देतात असे लिहून दिले. तो कागद फाडून टाकला. शेवटी वर्तकांच्या मर्जीतल्या ४ काँग्रेसवाल्यांचे जबाब घेऊन ते परत गेले. असे राज्य चालवत आहेत हे मंत्री.

—कालच मला हौसिंग बोर्डातला एक माणूस भेटला. माझी क्षमा मागायला लागला. मला काही कळेचना. कारण विचारल्याशिवाय म्हणाला, की मी वर्तकांच्या मतदार संघातला आहे. त्यांच्या निवडणुकीत मी काम केले आहे. त्यांचा खोटेपणा व त्यांनी तुम्हाला दिलेली वागणूक पाहून मला शरम वाटली. मीच तुमची क्षमा मागतो. मी क्षणभर स्तीमितच झाले. मला काही बोलताच येईना. त्या सामान्य माणसाकडून तरी वर्तकांनी काही शिकता आल्यास पहावे.'

गेले १५ दिवस रोज रात्री सभा बैठका होत आहेत. रात्रीचे दोन वाजतात. विधानसभेत जावेच लागते. झोप–जेवण कशाचाच पत्ता नाही. पण आता बोलताना कसलाच पत्ता लागत नव्हता. उत्साह थोडाही कमी नाही.

'मला इझमबिझमच्या चर्चेत जास्त अवास्तव रस नाही. लोकांच्या प्रश्नां-

साठी अहोरात्र झटणे एवढेच मला समजते. त्यासाठीच मग मिलो असो, किंवा दुधाचा प्रश्न असो, सामान्य माणसाच्या हितासाठी मला सारखे धडपडत रहावे असे वाटते.'

'दुधाचे भाव वाढवल्यावर मग शंकरराव चव्हाणांना घेराव घालायला आम्ही मागेपुढे पहात नाही.'

'माझ्या घरची मोलकरीण. दुधाने ९० पैसे लिटरवरून १ रु. २० पैसे लिटरवर उडी मारल्यावर बिचारीला दूध बंद करावे लागले. १ लिटर दूध तिघीजणीत वाटून घेत असत.'

'मुंबईतल्या कुठल्याही गृहिणीची दुधाच्या वाढत्या भावाच्या चिंतेतून सुटका झालेली नाही.'

'दुधाचे भाव ठरवताना शास्त्रीय पद्धतीने विचार करायला सरकार तयारच नाही. दूध उत्पादकांना भाव वाढवून हवा असतो. कारण गवत आणि भुस्स्याचे भाव अनियंत्रीतपणे वाढत राहतात. गहू ज्या किंमतीला मिळतो त्याच किंमतीला भुस्सा खुल्या बाजारात विकत घेण्याची पाळी, उत्पादकांवर येते. भुस्सा आणि गहू एकाच पातळीवर आणण्याची किमया केवळ कॉंग्रेसच करू शकते. परिणामी दुधाचे भाव वाढतात.'

'दुधाच्या किंमती ठरवतात शंकरराव चव्हाण आणि गवताच्या किंमतीचे खाते वर्तकांच्या हातात. असा घोळ आहे. वर्तकांच्या मतदारसंघात, ठाणे जिल्ह्यातच गवताची मक्तेदारी आहे. गवत खाऊन गब्बर झालेले दलाल ठाण्यात आहेत. त्या दलालांच्या आणि वर्तकांच्या संबंधातच गवताचे भाव का नियंत्रित होत नाहीत, पुरेसे गवत उत्पादकांना योग्य भावात का उपलब्ध होत नाही, ह्याचे रहस्य दडलेले आहे. एक उघड रहस्य जे तिथल्या पोरासोरांनाही माहीत आहे.'

'दूध महाग तर केलेच. वर आणखी दुधातला स्निग्धांशही कमी केला. ६% वरुन ५% वर स्निग्धांशाचे प्रमाण आणले असे शंकरराव म्हणतात. पण मुळात ७% असताना ६% वर केव्हा प्रमाण घसरले ते सांगण्यात आलेले नाही. म्हणजेच एकतर विधानसभेला तरी फसवले आहे किंवा १% ऐवजी दोन टक्क्याने प्रमाण कमी करून जनतेला तरी ते फसवत आहेत. माझी पहिल्यापासूनची मागणी आहे की साडेतीन टक्के स्निग्धांशाचे दूध सर्वांना दिलेत तरी चालेल; पण भाव कमी करा. सामान्य माणसाला दूध मुबलक प्रमाणावर उपलब्ध करून द्या. पण उपयोग काहीच होत नाही. मूग गिळून गप्प बसण्याची कला चव्हाणांना चांगलीच अवगत आहे. प्रश्न ते नेहमीच टाळतात. जर जनतेने हालचाल केली नाही, विशेषत: महिलांनी उचल खाल्ली नाही तर अशास्त्रीय पद्धतीने भाव ठरविल्याने भाव वाढतच राहतील आणि दिवसेंदिवस परिस्थिती आणखीनच बिकट होत जाईल. सामान्य माणसे होरपळून निघत राहतील.'

'मग ह्यावर कोणता उपाय तुम्ही सुचवाल?' मी.

'लोकांनी जागरुक राहून चळवळ

उभारल्याशिवाय काहीच मार्ग निघणार नाही. विशेषत: मध्यमवर्गीय स्त्रियांनी आता मैदानात आले पाहिजे. बिचाऱ्या गरीब महिलांना चळवळीत येता येत नाही. एक दिवस मोर्चासाठी येणे ह्याचा अर्थ घरी पोराबाळांना उपाशी तडफडत ठेवण्यासारखा होतो. त्यांच्या साठीही मध्यमवर्गीय महिलांनी काही-तरी करण्याची आवश्यकता आहे. पण हा गरिबांचाच प्रश्न राहिलेला नाही. आज ना उद्या उच्च मध्यमवर्गालाही वाढत्या भावांना तोंड द्यावेच लागणार आहे. म्हणून आता मध्यमवर्गी महिलांनी सोशल गॅदरिंग, हळदीकुंकू, भजने, इकेबाना, पाकक्रिया वगैरे प्रकार दूर ठेवावेत. परिस्थितीच अशी येते आहे की वेशभूषा करायला कापड मिळणार नाही, केशभूषेला तेलच मिळणार नाही. त्यांनी आता सक्रीय व्हायलाच पाहिजे.'

दिल्लीवाल्या बाईला खडे चारणारी ही 'पाणीवाली' बाई बोलतच होती. संपूर्ण जनतामय झालेली. 'चलो बस खाली करो' अशी आरोळी कंडक्टर देईपर्यंत मुलाखत संपवायची शुद्धच नव्हती. नेहमी येवढा प्रवास जांभया देत करत असतो. आज कसा झटकन वेळ गेला पत्ताच लागला नाही. प्रश्न उत्तर असा प्रकारच नाही. मृणालताई धडाधड बोलतच् होत्या. ही मुलाखत कमली, भूमिका जगणाऱ्या कलाकाराचे मोहवून टाकणारे असे हे एक स्वगतच होते.

● ○ ●

---


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे
यांचा
नवा
कथा संग्रह

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन

# कामे भरपूर
# प्रश्न आहे अंमलबजावणीचा !

वसंत देशपांडे

दुष्काळासारखा निसर्गाचा कोप म्हणजे अनेकांच्या उत्साहाला व उत्सुकतेला नामी संधी असते. ग्रामीण भागाची पुसटदेखील ओळख नसणाऱ्यांना एक-दोन दिवसाच्या फेरफटक्यांनी, ' अरे काय टॉप दुष्काळ आम्ही पाहिला ' अशी शेखी मिरवण्याची संधी प्राप्त होते. पीक पाण्याचा दुष्काळ म्हणजे सरकारी योजनांचे पेव. रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या, अन्नछत्राच्या, दवाखाने इ. अनेक योजना तयार होतात व त्याची कार्यवाही सुरू होते. परंतु अन्नधान्याच्या उत्पादनासारखेच हेही उत्पादन अपुरे असते. पत्रकारांची जरा चंगळच. कॅमेरे सरसावून, भरधाव जीपमधून पथके हिंडतात. त्यांचा भाव जास्त असतो. कारण त्यांच्या हातात वर्तमानपत्राचा आसूड असतो. त्यामुळे दुष्काळ असला तरी त्यांची सरबराई होते. राजकीय पुढाऱ्यांना आपले आसन स्थिर करण्याचा चान्स याच काळात मिळतो. भाषणांना धार चढते, रस्त्यावर प्रश्न सोडवण्याची भाषा रोजच्या बोलीत येऊ लागते. शहरातले ' सिनिक् ' हे नेहमीसारखेच थंड असतात. त्यांना सर्वठिकाणी अतिशयोक्ती दिसत असते. हे सर्व राजकारण आहे हे एकच निदान त्यांचे कायम असते. फार तर सरकारचा गलथान कारभार हे एकमेव कारण सांगून ते दुष्काळ निधीत भर टाकण्याची टाळाटाळ करतात. ' पैसे द्यायला हरकत नाही पण त्याच्या योग्य वापराबद्दल हमी काय ? ' ही एक पुरातन बाब त्या प्रसंगाला मदतीस धावून येते. फार तर ' दर आपत्तीला आम्हीच मदत करावयाचा काय मक्ता घेतला आहे ? ' असे आणखी एक कारण जोडीला. तथाकथित निरपेक्ष पद्धतीने अभ्यास करणाऱ्या समाजशास्त्रातील सशोधकांना ही एक मोठी पर्वणी असते. अनेक दिशांनी संशोधक घुसून ठराविक साच्याच्या प्रश्नावल्या भरून कागदांच्या

उत्पादनाला हातभार लावतात. निर्णय ठरलेलेच असतात. पण त्याला आकडेवारीची, तक्त्यांची सोबत लागते. हा दुष्काळ 'अँटिसिपेट' करता आला असता; कामे उत्पादक असावीत; तपशीलवार प्लॅनिंगचा अभाव; राजकारणामुळे योजना रेंगाळतात व त्यांचा तपशीलही बदलतो. सुखडीपेक्षा खोपडीबरी इत्यादी कोणत्याही प्रकारे तात्कालिन दृष्टया निरुपयोगी ठरणारे संशोधन याच काळात मोठ्या प्रमाणात पिकू लागते. होतकरू लोकांना 'पी. एच. डी.' दृष्टिपथांत दिसू लागते !

कोणताच हेतु मनात न ठेवता दुष्काळी भागात फेरफटका मारणे हे जरा अशक्यच. तथापी जीप असली म्हणजे जाण्याचा 'मोह' टाळता येत नाही आणि जाऊन आल्यानंतर 'आम्हीही दुष्काळ बघितला' हे न सांगणे तर त्याहूनही अशक्य !

बार्शी, करमाळा, माढा या भागातून आम्ही हिंडून आलो. वाटेवरची व अडवळणातली अनेक दुष्काळी कामे पाहिली. सर्व थरातल्या लोकांशी यथाशक्ती बातचीत केली.

अगदी प्रथम कोणती गोष्ट प्रकर्षाने जाणवली असेल तर ती ही, की ग्रामीणजनता आपले गाऱ्हाणे आज अधिक निर्भिडपणे, स्पष्टपणे व स्वत: पुढ कार घेऊन सांगू लागली आहे. तसा ग्रामीण भागाशी माझा परिचय नवीन नाही. अनेक निमित्ताने अनेक भागातून मी हिंडलेलो आहे. परंतु ग्रामवासीयांना बोलते करणे व त्यांच्याकडून हवी ती माहिती काढून घेणे हे कष्टप्राय वाटत आले आहे. आजची परिस्थिती अर्थात भिन्न आहे. त्यामुळे म्हणा किंवा आणखी काही कारणामुळे म्हणा, सडेतोड, स्पष्ट व चढत्या आवाजात असंख्य लोकांना बोलताना पाहून थोडे आश्चर्य व थोडे बरेही वाटले. तसा दुष्काळ आपल्या देशात नवीन पाहुणा नाही. परंतु तुलनात्मकदृष्ट्या आजपर्यंतच्या सर्व हालअपेष्टा ग्रामवासीयांनी निमूटपणे सहन केल्या. फारच झाले तर कोठे दंगेधोपे होत. परंतु शहरापर्यंत आवाज पोहोचण्यास खूप कालावधी लागत असे व तसा तो पोहोचलाच तरी बराच दबलेला असे. आजची परिस्थिती निराळी भासते. तक्रारी मांडण्यात आवाज आहे, बंडखोरीची सूचकता आहे. तक्रार कथनाच्या कार्यक्रमात लहानथोर या सर्वांचाच भाग असतो पण त्यातही स्त्रियांचा हिस्सा अधिक आहे. कामावरील अधिकाऱ्यांच्या उपस्थितीचा अडसर भासत नाही. उलट आपल्या म्हणण्याला त्यांच्याकडून हक्काने दुजोरा घतला जातो व अधिकारीही निमूटपणे तो देतात ?

## बदल : पण वांझोटा

हा बदल बऱ्याच प्रमाणात वांझ ठरलेला दिसतो. त्यांचा प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने उपयोग झालेला नाही. त्याची प्रचिती अनेक महत्त्वाचे प्रश्न होते तसेच आजही आहेत हे पाहून येते.

पहिली प्रमूख तक्रार मजुरी वेळेवर न मिळणे ही होय. आजही ही तक्रार असावी हे थोडे आश्चर्यकारक वाटले.

तीन तालुक्यातून सुमारे ७८ कामे पाहिली. तिथे एकेही ठिकाणी आठवड्याचा आठवड्याला पगार मिळालेला नव्हता. तीन आठवड्याचा पगार सरसकट बाकी राहिलेला दिसतो. पण ४ ते ६ आठवड्याचा पगार न मिळाल्याची उदाहरणेही सापडतात. मजुरीच्या दरापेक्षा मजूरी वेळेवर न मिळणे ही तक्रार अधिक महत्त्वाची आहे हे लक्षात ठेवावयास हवे. 'काय द्यायचे ते द्या पण लवकर द्या' असे असहाय्यपणे काढलेले उद्‌गार सर्वठिकाणी ऐकू येतात. ही तक्रार दूर का होऊ शकत नाही हे एक कोडेच आहे. सुदैवाने तहसीलदारांची गाठ पडली. त्यांचेबरोबर हा विषय काढला तेव्हा त्यांनाही जरा आश्चर्यच वाटले. साहजिकच आमच्यासारखे तिऱ्हाईत अधिक बुचकळ्यात पडले. तालुक्यात सर्व कामावर आठवड्याचे आठवड्याला पगार देण्याची सर्व व्यवस्था केली असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. उलट कामावरील अधिकारी मात्र मस्टर वेळेवर पोहचता करून देखील पैसे शिल्लक नाही अशी उत्तरे मिळाल्याचे सांगत. हे कोडे लवकरात लवकर उलगडले गेले पाहिजे. पावसाच्या पाण्यासारखीच पगाराचीही वाट पहावी लागणे हे अक्षम्य आहे. कोणतीही जीपगाडी कामावर आली, की बहुधा पगार घेऊन साहेब आले असे कामगारांना वाटते व आशाळभूताप्रमाणे ते काम सोडून घोळका करतात, पुढे पुढे आम्हालाही संकोच होऊ लागला.

रेशनचे अपुरे अथवा न मिळणारे धान्य ही त्यांची दुसरी व पहिलीशी निगडित असलेली तक्रार. ज्या दिवशी पगार होतो नेमके त्याच दिवशी स्वस्त धान्याच्या दुकानातील रेशनकार्डावर मिळणारे धान्य संपलेले असते. जिथे मिळू शकते तिथे अगदी अपुरे असते. उदाहरणार्थ चिखरडया गावात माणशी आठवड्याला अर्धा किलो गहू व अर्धा किलो मका मिळतो. प्रत्यक्षात खाण्यासाठी यांच्यापेक्षा कितीतरी पटीने धान्य लागते; अर्थातच ते खुल्या बाजारातून दुप्पट भावाने विकत घ्यावे लागते. काही ठिकाणी जेवढा माल येतो तो सर्व कुटुंबात सारखा वाटला जातो असे सांगण्यात आले. जगण्यासाठी लागणाऱ्या अन्नधान्यात बहुतांश भाग बाहेरून दुप्पट भावाने घ्यावा लागतो ही सर्वसाधारण परिस्थिती निश्चित दिसते. असे का व्हावे ? हेही एक कोडेच आहे. कारण तहसीलदार, यांचे सांगणेप्रमाणे प्रत्येक आठवड्याचे आठवड्याला प्रत्येक दुकानात भरपूर माल पाठविला जातो. धान्याची टंचाई नाही. करमाळा तालुक्याच्या तहसीलदारांनी सांगितले. तालुक्याला नेहमीच्या पुरवठ्याव्यातिरिक्त ५००० ज्वारीची पोती खास आणीबाणीच्या परिस्थितीत उपयोगी पडावीत म्हणून शिल्लक ठेवली आहेत. त्याचप्रमाणे पंधवड्यात केव्हाही माल गेला तरी चालते. असे असताना गावकऱ्यांना असा अनुभव का यावा ? याचा सरळ अर्थ असा की खालच्या पातळीवर काहीतरी गफलत होत

असावी. खुल्याबाजारात माल भरपूर मिळतो पण रेशनकार्डावर दाणाही मिळत नाही. तहसीलदारसाहेबांशी चर्चा करताना 'वाटप व्यवस्थेविषयीची सविस्तर माहिती मिळाली देखरेखी-साठी खास व्यवस्थाही उपलब्ध अस-ल्याचे सांगण्यात आले. शासन यापेक्षा अधिक काय करणार ? परंतु कोठतरी पाणी मुरत असले पाहिजे. ग्रामीण पातळीवर व्यापारी, शासनाधिकारी व काही पुढारी मंडळी यांचे संगनमत होत असले पाहिजे. त्याशिवाय सारी व्यवस्था असूनदेखील प्रत्यक्ष भुकेले-ल्यांना धान्य मिळू नये अशी शोकां-तिका घडणार नाही. याच्यावर उपाय काय ? वाढते भाव, अपुरे पगार, नियमितपणाचा अभाव यासर्व गोष्टी सातत्याने होत राहिल्यास त्याचे परिणाम गंभीर होतील. आज बोलण्यात निर्भिड झालेली जनता, प्रत्यक्ष कृती करू लागेल. तशी पाळी येईपर्यंत काहीतरी कृती व्हावयास हवी. ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुण काहीच कसे करू शकत नाही ?

## श्रमाची राजरोस चोरी

मजुरीचे दर ही त्यानंतरची तक्रा-रीची बाब. मजुरीचे प्रमाण उक्त्या कामावर अवलंबून असते. त्यामुळे रोज ठराविक दर पडेलच असे नाही. त्यातल्यात्यात खडी केंद्रावर दर बरा पडतो असा सर्वांचा अनुभव दिसतो. पण सुरुवातीला दर कमी पडतो. हे काम गडी व बायांचे मिळून असते. दगड खणून काढून देणे हे गड्याचे काम व नंतर त्याची खडी करणे हे बायांचे वा दोघांचे काम. लहान लहान गट किंवा कुटुंबाप्रमाणे गट करून काम करण्याचा प्रघात आहे. तशी गैरसोयही आहे. एकतर ज्या स्त्रियांना गड्याच्या अभावाने गट करता येत नाही त्यांना काम मिळणे कठीण जाते. विधवा स्त्रियांची ही प्रमुख अडचण. एकटी-दुकटीने काम मागितल्यास 'गडी घेऊन या मग काम मिळेल.' हे ठराविक उत्तर मिळते. ज्यांचे 'गडी' म्हातार-पणामुळे अथवा आजारपणामुळे कम-कुवत असतील तर त्यांची थोडी पंचाईत होते. हे ओळखून वास्तवीक काम मागणाऱ्यांचे योग्य पद्धतीने गट करण्याचे कामही स्थानिक अधिकाऱ्यांनी करण्याचा प्रयत्न करावयास हवा.

मजुरीचे दर बऱ्याच ठिकाणी फार कमी पडतात. उदाहरणार्थ कर्डू गावात चाललेल्या पाझर तलावाच्या कामात बायांना फक्त ६० पैसे मजूरी पडत असल्याचे सांगण्यात आले. आमच्या भोवती जमलेल्या घोळक्यातील स्त्रियांची परिस्थिती शोचनीय होती. त्या दोन तरुण विधवा व एक वृद्ध स्त्री यांनी आपल्या निवेदनाने आमची मने पिळवटून टाकली. आठ दहा तासां-च्या श्रमानंतर ६०–७० पैसे मिळवणे म्हणजे त्यांच्या श्रमाची राजरोस चोरीच होते असे म्हणावे लागेल !

या सबधात आम्ही स्थानिक देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांशी बोलणी केली. त्यांच्या मते लोकांचे काम फार कमी होते. कामाची अळंटळं मोठ्या प्रमाणा-

चर होते. ही तक्रार अनेकांच' आहे. त्यात थोडे सत्य आहे. विशेषत: पुरुष-वर्ग कामाची टाळाटाळ अधिक करीत असावा असे वाटते. परंतु हेही लक्षात ठेवावयास हवे, की मजुरांची शारीरिक परिस्थिती खालावलेली आहे. पोटाची खळगी मुख्यत: मक्याच्या भाकरीने भरली जाते. ती कोणासही रुचत नाही व पचत नाही. तिच्या कडवट चवीचा प्रत्यक्ष अनुभवही आम्हाला देण्यात आला. पण चवीपेक्षा पचनाच्या तक्रारी अधिक आहेत. कमजोर शरीरांनी अधिक श्रमांची कामे झटपट करावीत ही अपेक्षा चुकीची आहे. त्यातच उन्हाळ्याचो रखरख. साध्या तट्ट्याच्या शेडचीही सावली नाही. लहान मुले ठेवण्यास किंवा भाकरी खाताना सावलीचा आधार कष्टाने शोधावा लागतो. आमच्या थोड्याशा वास्तव्यासाठी देखील आम्हाला दूरच्या झाडाचा आश्रय घ्यावा लागत असे. मग दिवसभर रणरणत्या उन्हात कामगारांनी काम कसे करावे? किमान शेड उभी करावी ही मागणी मान्य होऊन देखील बहुसंख्य केंद्रांवर शेड दिसत नाही.

प्रथमोपचाराचा अभाव ही आणखी एक मोठी उणीव नमूद करावयास हवी. बऱ्याच ठिकाणी आठवड्यातून एकदा दवाखान्याची गाडी येते. परंतु अशा दुष्काळी कामावर गरज आहे ती अपघातात सापडणाऱ्या लोकांना तातडीने मदत देण्याची. मलमपट्टी अथवा इतर तत्सम मदतीची. सर्व खडीकेंद्रांवर दिवसाकाठी पाच पन्नास लोकांना लहान-मोठ्या जखमा होतात. काही वेळेला अपघात मोठ्या स्वरूपाचा असतो. एकट्याचे किंवा गटाचे काम बंद पडते. त्याचा परिणाम मजुरीवर होतो. उपचार करण्यासाठी काही मैलावर असलेल्या गावात सरकारी किंवा बहुधा खाजगी दवाखान्यात जावे लागते. म्हणजे कोणी बहुधा जातच नाही. लोकांच्या कामचुकाराबद्दल तक्रार करताना याही गोष्टींचा आपणास विचार करावयास हवा.

ज्या भागात सुखडी वाटली जाते तेथील मजूरांची परिस्थिती इतर भागातील परिस्थितीपेक्षा थोड्या प्रमाणात बरी म्हणावी लागेल. सुखडी रोजचेरोज मिळते पण कामकऱ्यांनाच मिळते. ती मुख्यत: त्यांच्या मुलाबाळांनाच उपयोगी पडते. त्यामुळे प्रत्यक्षात मजुरांना पौष्टिक अन्न देण्याचे उद्दिष्ट बऱ्याच प्रमाणात साध्य होत नाही. ज्या भागातून सुखडी मिळत नाही व रोजगार वेळेवर मिळत नाही तिथे निदान आम्हाला 'खोपडी' तरी द्या. (सुखडी ऐवजी खोपडी शब्द काहींनी चुकून वापरला. कदाचित संवयीचा परीणाम असावा!)

आठवड्याची सुट्टी म्हणजे दुष्काळात तेरावा महिना. आधीच मजुरी कमी त्यात सक्तीची सुट्टी, की ज्या दिवशी पगार नाही. सुखडी मात्र मिळते. ही आठवड्याची सुट्टी पगारी का होत नाही? चौकशीअंती कळले की पूर्वी (म्हणजे दोन वर्षापूर्वी) तशी व्यवस्था होती. पण दिल्ली सरकारने त्याला

मज्जाव केला. आता पुन्हा मुंबईसरकारने परवानगी मागितली आहे. ती येईल तेव्हा येवो. पावसासारखीच अनिश्चित. या गोष्टीसाठी दिल्लीसरकारवर का अवलंबून रहावे लागते ?

## अंमलबजावणी

हे सर्व दोष असले तरी एक गोष्ट निश्चित, की दुष्काळी कामे सरकारने मोठ्या प्रमाणावर हाती घेतलेली दिसतात. प्रत्यक्ष कागदोपत्री योजना जरी संपूर्णपणे अंमलात आणल्या गेल्या नसल्या तरी काम मागणाऱ्यांना थोडे-फार काम मिळते. त्याच्या कायमपणाची शाश्वती नसेल, त्यात खंड पडत असेल तरीसुद्धा गाव सोडून मोठ्या प्रमाणावर लोकांना जावे लागलेले दिसत नाही. उदा. बार्शी तालुक्यात ६८ खडी केंद्रे, १६ पाझरतलाव, ६४ सामुदायिक विहिरी, ८५ धडक योजनेतील विहीरी, २००० विहिरीतील गाळ काढण्याची कामे, एक मध्यम आकाराचे धरण इत्यादी अनेक कामे पार पाडली जात आहेत. सरकारी योजनांप्रमाणे प्रत्येक तीन खेड्यामागे एक २–४ लाख रु. चा पाझर तलाव व जमल्यास प्रत्येक खेड्यास एखादा छोटा तलाव होणार आहे. येत्या दहा वर्षात हा कार्यक्रम पार पाडला गेला तर महाराष्ट्रातील शेतीधंद्याचे स्वरूप पालटून जाईल. वर सांगितलेल्या कामांपैकी बरीच कामे उत्पादनवाढीस पोषक आहेत. खरा प्रश्न ही कामे कशाप्रकारे पार पाडली जातील हा आहे. त्याबद्दल अनेक जाणत्या लोकांच्या मनात भिती आहे. सामुदायिक विहीरींबाबत किमान १० टक्के विहिरीदेखील शिल्लक राहतील किंवा नाही याबाबत शंका आहे. रस्त्यांच्याबाबतीत असेच मत दिसते. खडी केंद्रावर इतकी खडी निर्माण झाली आहे, की एका अंदाजाप्रमाणे १९८१ पर्यंत हा पुरवठा पुरा पडेल; खडी केंद्र बंद करण्याचा सरकारचा अलिकडील निर्णय या संदर्भात असावा. पाझर तलावांच्या जागा निश्चित करताना शास्त्रीय दृष्टीकोन बाजूला सारून इतर दडपणाखाली काहींचे हितसंबंध साधण्यासाठी जागा मुक्रर केली जाते अशीही तक्रार ऐकू येते. यात अतिशयोक्तिचा भाग गृहीत धरला तरी काही तथ्यांश या तक्रारीत असणारच ! हे अटळ मानावयाचे काय ?


दुष्काळासारख्या आपत्तीमधे गावातील हेवेदावे विसरून लोक कामाला लागतील अशी आपली समजूत असते. ही समजूत किती भाबडी आहे याची प्रचिती येण्यास फार वेळ लागत नाही. परंतु ही भांडणे किती विकोपाला जाऊ शकतात याचे एक मासलेवाईक उदाहरण आम्हास एका खेड्यात पहावयास मिळाले. या गावात सरपंचाची पार्टी व त्याच्याविरुद्ध गावातील काही लोकांची दुसरी पार्टी. दोघांचे विळ्या-भोपळ्याइतके सख्य. गावातील लोक एका खडी केंद्रावर काम करीत होते. दहा-बारा दिवसापूर्वी काम बंद पडले व त्याच्या आधीच्या ४–५ आठवड्याचा पगार अजून दिला गेला नाही. लोकांची उपासमार. कित्येक कुटुंबात दिवसा-

फाठी एकवेळचे देखील जेवण मुष्कील होते. अशाच एका कुटुंबात एका स्त्रीचा मृत्यु झाला. हा भूकबळी म्हणून सरपंचाच्या विरुद्धच्या पार्टीचे म्हणणे. एका दृष्टीने ते बरोबरच वाटेल. कारण ती बाई वृद्ध असली व आजारी असली तरी आठ दिवस उपवास घडला होता हे सर्वमान्य होते. तो जरी मेली नसती तरी भूकबळीचा प्रसग यापेक्षा अधिक भयावह काय असणार ! तिच्या कुटुंबातील सर्व माणसे अर्धपोटी दिसत होती. गावातील अनेक कुटुंबे, विशेषत: लहानमुले निस्तेज, अशक्त दिसत होती. हा सारा भूकबळीचाच प्रकार मानायास हवा ! पण सरपंचांना फिकीर दिसली नाही. मृत्युची चौकशी त्यांनी केली नाही. मृत्युनतर दहा दिवसांनी त्यांना व कोतवालाला ही बातमी कळली. त्यानंतरही त्यांनी कुटुंबाला भेट दिली नाही. दीडशे-दोनशे घरांच्या गावात ही अनावस्था. हे सारे काही अजबच ! गंमत अशी की विरुद्धपार्टीलाही थोडे बरेच वाटल्यासारखे दिसत होते. सरपंचाच्या कारकीर्दीत भूकबळी पडला हे त्यांना दाखवायचे होते असे दिसले. त्यामुळे थोड्याशा विजयाच्या आवेशाने ही केस सांगण्यात त्यांचा उत्साह दिसत होता. काम बंद का पडले ? इतर कामे हाती का नाही घेतली ? यावर सरपंचाचे मत विरुद्ध बाजूचे लोक स्वतंत्र खडीकेंद्रे मागतात, ते मिळत नाही, पगार वेळेवर होत नाही, याबाबत आपण खूप खटपटीत आहोत असे त्यांचे म्हणणे. उलट पक्षाचे त्याचेविरुद्ध म्हणणे. हा भूकबळी वाचवणे दोघांनाही शक्य होते. अजूनही शक्य आहे. भूकबळी वाचवण्याची जबाबदारी सरकारी नियमाप्रमाणे सरपंचाची आहे पण सरपंचांना अजून त्या नियमाचे 'सक्युलर' पोहोचलेले नाही. भूकबळी हे गावातल्या दुष्काळीचेही बळी आहेत.

पिण्याच्या पाण्याची तऱ्हा याहून थोडी निराळी. त्यात स्पृश्य व स्पृश्यतर हे भेदभाव आजच्या परिस्थितीतही आहे तसाच आहे. हरिजनांची परिस्थिती पूर्णपणे दुर्लक्षित आहे. 'बोअरवेल' वास्तविक सर्व गावाची. त्याच्यावर एंजिन बसविल्याने शिवाशिवीचा प्रसंग आपोआपच टळतो. तरीसुद्धा हरिजनांना या विहिरीवर पाणी मिळत नाही. आगळगावात दोन बोअरविहिरी पाहिल्या. त्यातील पहिली विहीर हरिजनांची पण तो कित्येक दिवस नादुरुस्त आहे. नवीन स्पृश्यांसाठी विहीर तयार झाली. पण त्या वेळेला ही नादुरुस्त विहीर दुरुस्त करावी असे कोणाच्याही मनात आले नाही. स्पृश्यांसाठी काढलेल्या विहिरीला सुदैवाने भरपूर पाणी लागले, पण त्यातील एकही थेंब हरिजनांना मिळत नाही. गावात कोणी जिवंत तरुण आहेत की नाहीत ? एंजिनला हात न लावू देता देखील हरिजनांना पाणी देता येईल. सरकारला सक्ती करता येईल. राजकीय पुढाऱ्यांना प्रयोग म्हणून तरी काही करता येईल. शिक्षकांना निदान उपदेश तरी करता येईल. पण लक्षात कोण घेतो ? या देशातील सारे स्पृश्य भूकेचे वा तृष्णेचे बळी पडोत ! ● ● ●

# ' बॉम्बे '

## वाचक-विक्रेत्यांचे माहेर



कुमठाशेठ


मीराक्काचं. लग्न झालं तेव्हा मी नऊ दहा वर्षांचा होतो. पांडुरंग कुमठा हे आमच्या मामीचे मामा. म्हणजे माझी बहिण आणि मामी ह्या एकमेकींच्या माम्या होणार याची आम्हाला गमत वाटायची. पांडुरंगभय्या (भावोजी) हे नुकतेच बेळगावहून मुंबईला आलेले. त्यांचं शिक्षण कानडीतून, घरी रोजची भाषा कोकणी आणि वाचनलेखन बहुतेक इंग्रजीतून, त्यामुळे त्यांचं मराठी यथातथाच. शिवाय ते मुंबईच्या शहरी उपचारात रुळले नव्हते. त्यामुळे त्यांच्या वागणुकीत बावळटपणा डोकवायचा. घरातली आम्ही लहान भावंडं येता जाता त्यांच्यावरून खदखदत असू. अर्थात नव्या माणसाबद्दल कौतुकाचा भाग होताच. आमच्या घरातील पहिला गोरा माणूस. ते बासरी चांगली वाजवत. इंग्रजीतून लेखन करीत, कविता करीत शिवाय एम्. ए. झालेले आणि ऑफिसात जाणारे.

आमच्या मेहुण्यांची आमची दोस्ती झाली त्यात त्यांच्या लेखी आमची टिंगल किंवा आमचं कौतुक ह्या दोहोंलाही महत्त्व नव्हतं. सगळ्यांशी चांगलेपणाने, मोकळेपणाने आणि सरळपणाने

# २५

माझे वडील म्हणाले–
या चाव्या घे आणि उद्या
गिरगावातील बाँबे बुक
डेपो उघड. आम्हाला हसू
आलं. कारण उद्या १ एप्रिल
होता. कुमठा एप्रिल फूल
होणार अशी शंका आली...

रामदास भटकळ



वागायचं हा त्यांचा प्रकृतीधर्मच. तेव्हा घरातील वडिलधारी मंडळी काय किंवा आम्ही लहान मेहुणेमंडळी काय–साऱ्यांशीच ते गोड वागायचे आम्हीही त्यांच्या मऊपणाचा फायदा घेऊन त्यांच्याकडून वेगवेगळी कामं करवून घेत असू. एकदा आमच्या वाडीतील कार्यक्रमात पोरापोरांचे कार्यक्रम संपले तेव्हा त्यांना घेरून आम्ही बासरी वाजवायला लावली होती.

त्यावेळच्या दोन आठवणी–कुमठांचा आवडता लेखक जोसेफ कॉन्राड. काही दिवस त्यांनी कॉन्राडच्या कादंबऱ्यांवर प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळवायचाही विचार केला होता. त्या निमित्ताने ते अधूनमधून इंग्रजी वाङ्मयासंबंधी लेख लिहित आणि वर्तमानपत्रांकडे पाठवीत. त्यातील एक लेख परत आला तेव्हा कोणी त्यांना म्हणालं, ' हे वर्तमानपत्र-वाले लोक सगळे दाक्षिणात्य कुमठा हे कर्नाटकातलं गाव असलं तरी त्यांच्या लक्षात आलेलं दिसत नाही. तुम्ही नाव बदलून हाच लेख पुन्हा पाठवा. ' त्याप्रमाणे त्यांनी के. एन्. पी. राव ह्या नावाने तोच लेख त्याच वर्तमानपत्राकडे पाठविला आणि तो छापूनही आला.

पुढे ह्या नावाने त्यांनी बरेचसे लेखन केले.

दुसरी आठवण त्यांच्या मित्राची. जी. ए. कुलकर्णी हे त्यांचे वर्गबंधू. ते एकदा आमच्या घरी आले होते. त्यावेळी पॉप्युलरचा मराठी जगाशी फारसा संबंध नव्हता. तेव्हा ज्यांच्या कथा मासिकातून चक्क छापून येतात असा एक थोर लेखक आमच्या मेहुण्यांमुळे आमच्या घरी आला याचा आम्हाला फारच अभिमान वाटायचा. आजचे जी. ए. हे त्या जी. एंना ओळखणार नाहीत हा भाग वेगळा.

लग्नानंतर थोड्याच दिवसात कुमठांनी नोकरी सोडून दिली आणि ते पॉप्युलर बुक डेपोमधे काम करू लागले. दोन–एक वर्षं ते पॉप्युलरच्या कॅशवर बसलेले असायचे आणि समोरच काउंटरवर त्यांचे श्वशुर गणेशराव भटकळ स्वत: उभे राहून गिऱ्हाइकांची विचारपूस करायचे. ह्या दोन वर्षांत कुमठांनी आमच्या वडिलांच्या वागणुकीचे आणि कार्यपद्धतीचे जे संस्कार स्वत:वर करून घेतले ते आम्ही त्यांची मुलंही अंगी बाणवू शकलो नाही.

लहानपणापासून आम्हाला आमच्या दुकानात जायची सवय. त्यावेळी आमचं एकच दुकान होतं. घर जवळच. सायंकाळी वाडीत खेळून झालं की तासभर तरी दुकानात जायचं, थोडीशी लुडबूड करायची नि मग वडील, दादा किंवा कुमठा यांच्याबरोबर घरी परतायचं हा आमचा जणू नित्यनियम. ३१ मार्चची गोष्ट. असेच आम्ही घरी आलो आणि वडील कुमठांना म्हणाले, ' ह्या चाव्या घे आणि उद्या गिरगावातील बाँबे बुक डेपो उघड.' आम्हाला हसू आलं. उद्या १ एप्रिल, तेव्हा कुमठा एप्रिल फूल होणार अशी शंका आली. परंतु वडिलांच्या स्वभावाशी ही थट्टा सुसंगत नव्हती. मग पाहतो तो खरंच 'बाँबे बुक डेपो' आम्ही विकत घेतला होता.

त्या दिवसापासून गेली पंचवीस वर्षं बाँबे बुक डेपोची वाढ ही कुमठांच्या नेतृत्वाखाली झालेली आहे.

कुमठांनी आपल्या नव्या कार्याला सुरुवात केली त्यावेळची परिस्थिती अशी होती. बॉम्बे बुक डेपो हा गिरगावात. तेव्हा मुख्य शक्यता मराठी पुस्तक विकण्याचीच होती. दुकान त्या पूर्वीच्या पंचवीस वर्षांत नावारूपाला आलेलं पण त्या शेवटच्या काही वर्षांत थोडसं दुर्लक्ष झालेलं. गिरगावात आजूबाजूला पुष्कळ पुस्तक विक्रेते. त्यापैकी बहुतेक सेकंडहँड पुस्तकांचीही खरेदी-विक्री करणारे. मध्यमवर्गीय ग्राहकांचे आणि काही उच्चवर्गीयांचेही वळण त्यांचेकडे. याउलट बॉम्बे बुक डेपो एक लायब्ररी चालवीत असे – जनता वाचनालय. त्या निमित्ताने बरेच वाचक दुकानात येत. कुमठांना पॉप्युलरचे पाठबळ होतेच. गिऱ्हाइकांना कसे समाधान द्यावे याचे प्रात्यक्षिक त्यांनी आमच्या वडिलांकडून घेतले होते. 'पॉप्युलर'सारख्या संस्थेत काम केल्याने

पृष्ठ ४९ वर

# आलेपाक

■ मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री सेठी यांच्या हाती राज्याची १८ खाती आहेत. साहजिकच मुख्यमंत्र्यांना आपल्या खात्यांकडे लक्ष द्यायला फुरसत होत नाही. अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या रकमा खर्च होऊ न शकल्यामुळे तरतुदी वाया गेल्या आहेत. इतर काही खात्यांनी मार्चअखेर पैसा संपवण्यासाठी वारेमाप खर्च चालवला आहे. भाषाविभागाला ग्रंथखरेदीसाठी जो पैसा दिला होता तो वेळीच खर्च होऊ न शकल्यामुळे मिळतील ते ग्रंथ कोणतेही तारतम्य न ठेवता खरेदी करण्याचा सपाटा या विभागाने चालवला आहे. विधानसभेत एका सदस्याने सांगितल्याप्रमाणे या भाषाविभागाने कोकशास्त्राची पुस्तके खरेदी केली आहेत.

ही पुस्तके इतक्या मोठ्या प्रमाणावर खरेदी केली गेली आहेत की आता भाषाविभागाऐवजी याच पुस्तकांच्या अभ्यासाला खरा वाव देणारा विभाग निर्माण करण्याचे घाटते आहे असे ऐकतो.

■ विधानसभेत अश्लील जाहिरातचित्रांबद्दल उद्भवलेल्या चर्चेत श्रीमती लीला मर्चंट यांनी अशी तक्रार केली की या जाहिरातीत मुख्यत: स्त्रियांचीच चित्रे असतात.

बरोबर आहे : कारण या जाहिराती मुख्यत: पुरुषच पाहतात, असे मानले जाते.

■ एका अग्रलेखात म्हटले आहे : अपशब्द हे एक व्यसनच आहे.

काही जणांच्या बाबतीत नुसते शब्द हेसुद्धा एक व्यसनच असते.

■ समाजवादी पक्षाचे ना. ग. गोरे राज्यसभेत म्हणाले : निक्सन सरकारला भारताबद्दलचा दृष्टीकोन बदलण्यास सांगणे म्हणजे कुत्र्याचे शेपूट सरळ करण्याच्या प्रयत्नासारखेच आहे.

ज्यांची हयात कुत्र्याचे शेपूट सरळ करण्याच्या विधायक उद्योगात गेली त्यांनी असे म्हणावे ?

■ एका दैनिकातील मिरजेच्या वार्तापत्रात म्हटले आहे : या तालुक्यात यापुढे गाय बघायला मिळेल की नाही याची शंका आहे.

गायीचे मरो; 'गाय-वासरा'चे काय ते बोला.

■ महाराष्ट्र-विधानसभेत टी. दा. मेमजादे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना वनमंत्री मधुकरराव चौधरी म्हणाले : महाराष्ट्र राज्यात सिंह नसल्यामुळे त्यांच्या शिरगणतीचा प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्यात सगळे कोल्हेच; त्यामुळे त्यांच्याही शिरगणतीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

■ प्रसिद्ध अभिनेत्री राखी एका मुलाखतीत म्हणाली, मी मोठा विचारविचार करून काम करते असे मुळीच नाही.

तसे काही केले की संपलेच की सारे.

■ एक बातमी : भारतातील शहरांपैकी दिल्लीत गुन्ह्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

दिल्लीचे सगळेच मोठे.

■ एक प्राध्यापक म्हणतात : अलीकडे गलिच्छ, ओंगळवाण्या देखाव्यांची नाटके रंगभूमीवर फार येऊ लागली आहेत, हा एक चिंतेचा विषय आहे.

तिकिट काढूनदेखील कधी कधी ही नाटके प्रेक्षकांना पाहता येत नाहीत, हा दुसरा चिंतेचा विषय आहे.

■ एका मुलाखतीत इंदिरा गांधी म्हणाल्या : जर मी सांगितलेली उपाययोजना जगाने केली असती तर डिसेंबर १९७१ चे भारत-पाक युद्ध टळले असते.

यात काय विशेष ? सगळ्या वृत्तपत्रसंपादकांनाही आपल्या उपाययोजनेबाबत असेच वाटते.

■ याच मुलाखतीतील एक प्रश्न : गांधीवादात गांधी टोपीला फार महत्त्व आहे काय ?

अलबत. अहो गांधी टोपीलाच काय, तिच्या कोनालासुद्धा फार महत्त्व आहे.

■ महाराष्ट्र टाइम्समध्ये जर्मन चित्रपट महोत्सवाची माहिती देणाऱ्या लेखात सांगितले आहे : जर्मनीमध्येदेखील 'फक्त प्रौढांसाठी' चित्रपट असतात; पण वयाची मर्यादा मात्र इथल्यासारखी १८ वर्षे नसून आठ वर्षांची आहे.

जर्मनीतले (किंवा इतर पाश्चात्य राष्ट्रातले) हिशेबच वेगळे. तिकडे आठव्या वर्षी प्रौढत्व येते आणि ऐंशी वर्षे पुरी झाली तरी तारुण्य सरत नाही !

■ बलराज मधोक म्हणतात : जनसंघात सुधारणा करण्याचे प्रयत्न अयशस्वी ठरल्यास नवा पक्ष काढण्याचा प्रयत्न मी करीन.

मधोकांना काढल्यावर आता जनसंघात आणखी कोणतीही सुधारणा करण्याची गरज नाही, असे जनसंघाधिपतींचे मत आहे.

■ केंद्रीय मंत्री गुजराल एका परिसंवादात म्हणाले : शहरातील सर्वात उंच झाडापेक्षा कोणतीही इमारत उंच असता कामा नये, अशी माझी इच्छा आहे.

देशातील सर्वात बावळट माणसापेक्षा कोणत्याही मंत्र्याने अधिक बावळटपणा दाखवू नये, अशी सर्वांची इच्छा आहे.

■ राज्य नाट्य स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभात वसंत देसाई म्हणाले :

साहित्यात व नाटकात वाईट गोष्टींचा धोत्रा मिसळला गेला तर समाजावर त्याचे भयंकर परिणाम होतील.

पण साहित्यातील धोत्रा(प्र) वर्तकांना हे बिलकुल मान्य नाही.

मराठी वाचक आणि प्रेक्षक साहित्य-मिलोतील धोत्र्याच्या बिया चाळून चाळवून (चालवून) घेतील, असे त्यांना वाटते. ●

## सत्याग्रही काणेकर

साहित्यिक कार्यक्रमांना अधूनमधून जाण्याची खोड मला आहे. अशा प्रसंगी व्यासपीठावर अनंत काणेकर बऱ्याच वेळा दिसतात. प्रत्येक वेळी, काणेकर आता थोडे म्हातारे दिसायला लागले, असे आम्ही मित्रमंडळी एकमेकांना सांगतो. त्यात खरे म्हणजे, सदुसष्टाव्या वर्षीही ते म्हातारे कसे दिसत नाहीत, याचे कौतुक असते.

अनंत काणेकर अध्यक्षबिध्यक्ष असले की कोणत्याही कार्यक्रमाला बऱ्यापैकी शोभा येते. या दृष्टीने काणेकर, टोपी-गंध उपरणे-लांब कोट यांच्या शिवायचे मुंबईचे दत्तो वामन पोतदारच आहेत.

काणेकरांनी पुष्कळ लिहिले आहे. पण ते सारे लेखन स्फुट स्वरूपाचे आहे. कारण कसून काम करणे काणेकरांच्या स्वभावात नाही. मागे ते म्हणे सोन-कोळचांच्यावर प्रबंध लिहिणार होते; पण प्रबंध लिहिण्याचा विचार त्यांनी केला हेच खूप झाले; एरवी काणेकर हा प्रबंधाच्या वाटेला जाणारा माणूस नव्हे. थोडे करून पुष्कळ मिळालेलो काही भाग्यवान माणसे असतात. काणेकर त्यातले एक आहेत.

त्यामुळे परवा वर्तमानपत्रात आलेल्या एका बातमीने मला फार गंमत वाटली. काणेकर मुंबईला वांद्रे येथील साहित्य-सहवासात राहतात. तेथील पूर्वी दुहेरी असलेला एक बसमार्ग आता एकेरी करण्यात आला आहे. त्यामुळे अनंत काणेकरांची आणि इतर हजारो नाग-रिकांची केवढी तरी गैरसोय झाली आहे. या प्रकरणी पुष्कळ तक्रारी करूनही काही होईना तेव्हा 'अंतिम उपाययोजना म्हणून' काणेकरांनी सत्याग्रह करायचे ठरवले आहे. काणेकर वृत्तीने मध्यमवर्गी; त्यातून प्राध्यापक; अशा माणसाने अंतिम उपायाची भाषा बोलायची, सत्याग्रह करायचा, म्हणजे कमाल झाली.

उद्या मृणाल गोरे एखाद्या क्लबमध्ये जाऊन रमी खेळू लागल्या तर जसे वाटेल तसेच काणेकर सत्याग्रह करणार या बातमीमुळे मला वाटले.

अर्थात अनंत काणेकर असल्यामुळे या सत्याग्रहाला बऱ्यापैकी शोभा येईल यात शंका नाही. शिवाय, काणेकरांच्या हाताला यश असल्यामुळे तो सत्याग्रह यशस्वी होईल ते वेगळेच.

—अनंतराव

# ' यु.क्रां.द. 'ला अनावृत्त पत्र

श्री. मा. भावे

मित्रहो,

मी तुम्हास ' मित्रहो ' असे संबोधिले खरे, परंतु तुमच्यांतील बहुतेक जण त्या संबोधनाला आणि अनावृत्त पत्र लिहिण्यालाही हरकत घेतील असे वाटते. ते स्वाभाविकही आहे. कारण आजपर्यंत तुम्ही जी कार्ये हाती घेतली त्यात मी कधीही सहाय्य केले नाही. इतकेच नव्हे तर त्या कार्याची उद्दिष्टे व ती कार्य करण्याची तुमची पद्धती याविषयी कसलीही आस्था मला वाटली नाही. असे असतानाहि मी हे का लिहित आहे?

तुमचे नेते श्री. सप्तर्षी यांनी दिनांक २१ मार्च रोजी श्रीशंकराचार्यांशी काही वाद घातला त्यावेळी मी तेथे उपस्थित होतो. परंपरागत विचारांची चाकोरी सोडून अधिक व्यापक पायावर वाद घालण्याची तयारी दाखविणाऱ्या शंकराचार्यांशी अधिक प्रौढ पातळीवरून व जरा जास्त शिस्तीने वाद व्हावयास हवा होता असे मला तो वाद ऐकून वाटले. पण मुद्दा तो नाही. त्या वादातील आपली बरीवाईट बाजू ज्या निवळशंख प्रामाणिकपणाने आणि जिद्दीने श्री. सप्तर्षी यांनी मांडली त्या प्रामाणिकपणाविषयी आपुलकी वाटल्याने हे पत्र लिहिण्यास मी उद्युक्त झालो आहे.

चातुर्वर्ण्य उखडून टाकण्यास तुम्ही मंडळी कटिबद्ध आहात. तुमच्या उद्दिष्टाच्या योग्यायोग्यतेविषयी मी साशंक आहे. तथापि एकदां उद्दिष्ट ठरल्यानंतर ते गाठण्याच्या उपायाची योग्यता ठरविता यते हे महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने तुम्ही कोणती कार्यपद्धति अवलंबित आहात व त्या पद्धतीने तुमचे उद्दिष्ट साध्य होईल काय याचा विचार त्या उद्दिष्टांशी सहमत नसताना देखील करता येईल.

तुम्ही याबाबत तीन प्रकारे कार्य करीत आहा असे दिसते. पहिले म्हणजे चातुर्वर्ण्याचे तत्त्वज्ञान व आचार यांची हेटाळणी करून त्याविषयी अनादर उत्पन्न करणे, हरिजनांवरील अन्यायाची ताबडतोब तड लावणे आणि हरिजनांचे जीवन सुसह्य होईल असे काही विधायक कार्य क्वचित करणे हा तिसरा उपाय. मला वाटते हे तिन्ही मार्ग यापूर्वीहि

तुमच्याहून आधिक सुसंघटित संघटनांनी व तुमच्या नेत्याहून अधिक प्रतिभाशाली अशा नेत्यांनी चोखाळले आहेत.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ३५–४० वर्षापूर्वी चातुर्वण्याचा, हिंदू कर्मकांडाचा, हिंदू व्यवहारपद्धतीचा काय कमी उपहास केला होता ? सहभोजने घडवून अस्पृश्यांसाठी शाळा चालवून त्यांना हिंदू जीवन पद्धतीत संमीलित करून घेण्याचे प्रयत्न हिंदुत्व-वाद्यांनी त्याकाळी सर्वशक्तींनिशी केले. परंतु ते सर्व पचवून व सावरकरांची स्तुतिस्तोत्रे गात श्रीशंकराचार्य तुम्ही केलेली निंदा स्वीकारावयास तयार आहेतच ! डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखा प्रतिभाशाली नेता क्वचितच होतो. ते स्वत: हरिजनांपैकीच असल्याने त्यांना हरिजनांच्या उद्धारासाठी वाटणारी कळकळ इतरांच्या कळवळीपेक्षा रतिभरहि कमी नव्हती. परंतु हिंदुधर्मात राहून चातुर्वर्ण्याचा उच्छेद करणे त्यांनाहि जमले नाही व बौद्ध धर्माचा आश्रय घ्यावा लागला.

पण परधर्माचा आश्रय करून देखील चातुर्वर्ण्याचे जोखड झुगारता यईलच असे नाही. स्वत:ला ब्राह्मण म्हणवून घेणारा एक मुसलमान व खालच्या जातीची म्हणून आपल्याच ख्रिश्चन धर्मातील तरुणीशी लग्नास नकार देणारा ख्रिश्चन तरुण मी पाहिलेले आहेत. स्वत: आंबेडकरांनीच त्यांच्या पाकिस्तानवरील पुस्तकात भारतीय मुसलमानांतील जातिव्यवस्थेची माहिती दिली आहे. पराकोटीच्या विषमतेने परिपूर्ण व जगण्याचा आनंद संपूर्णपणे हिरावून घेणारे असे चातुर्वर्ण्याचे तत्वज्ञान आहे असे तुम्ही मानता आणि तरी देखील केवळ हिंदू मनालाच नव्हे तर भारतीय बुद्धीला त्याची भुरळ पडलेली आपणास दिसत असते याचे मर्म जाणून घेण्याचा प्रयत्न तुम्ही का करीत नाही ?

चातुर्वर्ण्याच्या वर्चस्वाचे तुमचे साधे व साचेबंद उत्तर मला माहीत आहे. ते म्हणजे अंधश्रद्धा आणि आपमतलब. मला वाटते हे उत्तर देण्यात तुम्ही स्वत:ची फसवणूक करून घेत आहात. कोणत्याहि मतलबाचा ज्याच्यावर आरोप करता येणार नाही अशा प्रज्ञावंत पुरुषांनीही चातुर्वर्ण्य मान्य केले आहे इतकेच नव्हे तर प्रशंसिलेहि आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे हे अतुलनीय प्रज्ञावंत होते, सर्वसंगपरित्याग केलेल्या राजवाड्यांना कोणताहि मतलब निश्चितच नव्हता. आपली मते निडरपणे व सावेश मांडण्यात त्यांच्या काळी त्यांची बरोबरी करील असे कोणी नव्हते. तथापि त्यांनी अनेक लेखातून चातुर्वर्ण्याचा पुरस्कार केलेला आहे, महात्मा गांधी यांच्यावरहि मतलबाचा व अंधश्रद्धेचा आरोप करणे अशक्य. सारे आयुष्य नवनवीन प्रयोग करण्यात त्यांनी घालविले. लोकमताला ठोकरण्याचे व वाकविण्याचे त्यांचे सामर्थ्य अद्वितीय होते. परंतु अशा महात्म्याने सुद्धा चातुर्वर्ण्याचा स्वीकार केला होता. काही तपशीलाबाबत त्याचे मतभेद होते. पण ते सुधारून घेण्याचे

त्यांचे मार्गहि लक्षणीय होते. त्याचा उल्लेख पुढे येईलच.

हे सर्व पहाता भारतीय मनावरील चातुर्वर्ण्याचा जो पगडा आहे त्याचे पुरेसे स्पष्टीकरण तुमचे उत्तर देत नाही. हे उघड आहे. भारतीय प्रज्ञेला चातुर्वर्ण्याची ही जी भुरळ पडली आहे, भारतीय बुद्धिमत्ता चातुर्वर्ण्याच्या चाकोरीत अवरुद्ध झाली आहे त्याची कारणे एकूण मनुष्य जातीच्या बुद्धीच्या मर्यादेत सापडण्यासारखी आहेत असे मला नम्रपणे सुचवावेसे वाटते.

रचना शोधणं, तपासणे व जमल्यास नव्या रचना निर्माण करण याची मनुष्याच्या बुद्धीला फार हौस आहे. ती हौस हा मनुष्याच्या बुद्धीचा गाभाच होय. नाना शास्त्रे मग ती भौतिक असोत, सामाजिक असोत अगर नैतिक असोत त्यांचा उगम आणि विकास बुद्धीच्या या छंदातून झालेला आहे. श्री. सप्तर्षी शंकराचार्यांशी चाललेल्या वादात वैज्ञानिक सिद्धांतांचा हवाला वारंवार देत होते. ते वैज्ञानिक सिद्धान्त नैसर्गिक नव्हेत. निसर्गाच्या निरीक्षणातून मानवी बुद्धीने शोधलेली ती एक रचना आहे, असे खुद्द बर्ट्रान्ड रसेलनेच आपल्या 'मी ख्रिस्ती का नाही' या ग्रंथात विवेचिले आहे.

रचनेचा हव्यास मनुष्याच्या बुद्धीला असल्याने जेव्हा जेव्हा एखादी प्रगल्भ, परिणत व जटिल रचना बुद्धीच्या समोर येते तेव्हा तेव्हा बुद्धा अवरुद्ध होते. हे पटण्यासाठी ज्यात कोणाचा कसलाही मतलब गुंतलेला असण्याचे कारण नाही अगर ज्यात अंधश्रद्धेला मुळीच वाव नाही असे उदाहरण मी घेतो, ते म्हणजे युक्लिडच्या भूमितीचे. या भूमितीने गणित क्षेत्रात वावरणाऱ्या मानवी प्रज्ञेला दोन हजार वर्षे प्रतिहत, कुंठीत करून ठेवले होते. त्या दोन हजार वर्षांत इतर शास्त्रात नेत्रदीपक प्रगती झाली. न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत प्रस्थापित झाला; कान्ट, हेगेल यांची अभिमान वाटावा (रचनेच्या दृष्टीने) अशी तत्त्वज्ञाने निर्माण झाली; अर्थशास्त्र जन्माला येऊन प्रौढावस्थेला पोचले परंतु युक्लिडच्या भूमितीची भुरळ अणुमात्र कमी झाली नाही.

ही भुरळ अंधश्रद्धेवर आधारलेली नव्हती, मतलबाचा वासमुद्धा तिला नव्हता. ही भुरळ रचनेच्या प्रगल्भतेची, जटिलतेची होती. केवळ दहा मूलसिद्धान्ताचा आधार घेऊन मनुष्याच्या बुद्धीने अनेक प्रमेयांचा हा पट विणलेला होता. आपल्या कर्तृत्वाच्या या आविष्काराच्या दर्शनानेच ती मानवी प्रतिभा स्वतःला हरवून बसली होती आणि या खेरीज दुसऱ्या रचनेचा संभव आपल्या हातून होईल असा आत्मविश्वास तिला वाटत नव्हता.

गणितशास्त्राविषयी रसेलने म्हटले आहे की मानवी बुद्धीने आपला अप्रतिहत संचार व्हावा या हेतूने हे नवे विश्व निर्माण केले आहे. अशा गणितशास्त्रातसुद्धा मनुष्याची प्रज्ञा दोन-दोन हजार वर्षे खिळून रहात असेल तर सामाजिक व्यवहारात जेथे प्रज्ञेच्या संचाराला पदापदी अडथळ निर्माण होतात, श्रद्धा,

स्वार्थ व असूया यांच्याशी जेथे क्षणाक्षणाला तडजोड करावी लागते—ती अवरुद्ध होईल यात काहीही नवल नाही.

मला असे म्हणावयाचे आहे की चातुर्वर्ण्याची भारतीय बुद्धीला जो भुरळ पडली आहे त्याचे स्पष्टीकरण येथे आहे. चातुर्वर्ण्याच्या रूपाने जीवनाच्या सर्व आंगोपांगांना स्पर्शून जाईल अशी एक समाज रचना भारतीय प्रज्ञेने निर्माण केली. ही रचना प्रत्यक्षात येण्यासाठी येथील मानवसमूहाच्या प्रत्येक घटकाने अद्वितीय त्याग केला. या रचनेचे मूलतत्त्व 'कोणतीही दोन मनुष्ये समान नसतात' असे आहे पण हे मूलतत्त्व चांगले की वाईट हा प्रश्नच या रचनेत उद्भवत नाही. सर्वंकषता, जटिलता, तर्कनिष्ठा या रचनेच्या आकर्षकतेच्या ज्या कसोटया आहेत त्यात ही चातुवर्ण्यव्यवस्था पूर्णपणे उतरते. असे असल्यामुळेच आत्मप्रत्यय हरवून भारतीय बुद्धी येथे खिळून राहिली आहे.

चातुवर्ण्यव्यवस्थेच्या या सामर्थ्याचे तुम्ही आदरपूर्वक परीक्षण करावे असे मला वाटते. कारण या सामर्थ्याची अशी चिकित्सा केल्याखेरीज तुम्हाला मार्ग सापडणार नाही. चातुर्वर्ण्याची हेटाळणी व उपहास करून हा मार्ग सापडणार नाही. कारण उपहास परिणामकारक होण्यासाठी उपहासकर्ता व उपहासविषय यांच्यात काही सामंजस्य असावे लागते. असे परीक्षण केल्यानंतर तुम्हाला जो उपाय सापडेल असे मला वाटते तो असा.

मनुष्याच्या बुद्धीला रचनेचे परीक्षण करण्याचे, अस्तित्वात असलेल्या रचना अधिक परिणतावस्थेला नेण्याचे आकर्षण आहे हे खरे. पण त्याहून अधिक आकर्षण नवीन रचना निर्माण करण्याचे आहे. लास्कीने A Dilemma of our Times नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. त्यात रशियन राजवटीतील जुलमाचे वर्णन करून त्याने म्हटले आहे की, असे जरी असले तरी नवीन समाज निर्माण करण्याचा तेथे एक प्रयोग चालला या गोष्टीचे आकर्षण इतके सामर्थ्यशाली आहे की या जुलमाकडे दुर्लक्ष होते.

तेव्हा तुम्ही आणि तुमच्याशी सहमत असलेल्या मंडळींनी चातुर्वर्ण्यापासून अलग असे आनंदी व आकर्षक रचनेचे परिवार निर्माण करावेत. त्या परिवारांकडे पाहून चातुर्वर्ण्यांकित प्रज्ञेला आत्मप्रत्यय मिळाला पाहिजे की चातुर्वर्ण्याखेरीज निराळी व तितकीच आकर्षक अशी रचनासुद्धा आपणास निर्माण करता येते. गांधीजींनी गावाबाहेर आश्रम उभारले व तेथे असे आनंदी, स्वयपूर्ण परिवार निर्माण केले. त्यातील हेतु असाच असावा असे मला वाटते.

● ● ●



'इंटेन्सिव्ह' केअर वार्डमधून मी बाहेर पडलो आणि माझ्या विद्यार्थ्यांनी मला घेरलंच! मुख्य परिचारिका पुन्हा पुन्हा सांगत होती, "सर खूप थकले आहेत, तुम्ही पुन्हा या." ते पटल्यामुळं म्हणा, किंवा माझा थकलेला चेहरा पाहिल्यावर खात्री पटल्यामुळं म्हणा, विद्यार्थ्यांनी मला सोडलं. पण पुन्हा भेटण्याचं आश्वासन घेऊनच!

मी माझ्या खोलीत आलो, अन् आरामखुर्चीत अंग झोकून दिलं. परिचारिकेनं मला विचारलं, "डॉक्टर, काय आणू? चहा की कॉफी? तुम्ही फार थकला आहात."

"फक्त एक कप चहा." मी म्हणालो.

खरंच मी फार थकलो होतो. नीताला शांत झोप लागली होती गेल्या पंधरा वर्षांचा संघर्ष संपला होता!

पंधरा वर्षं!

केवढा प्रदीर्घ कालखंड! परंतु कसा गेला ते मुळी समजलंच नाही. अन् समजणार तरी कसं? माझं काळाकडे लक्ष होतं कुठे? मी आपल्याच कामात गर्क होतो. नीता...

"डॉक्टर, चहा आणलाय." परिचारिका आली आणि तिनं चहा कपात ओतताना सांगितलं, "बाहेर काही वार्ताहर आले आहेत. थोडं थांबून यायला सांगू का त्यांना ?"

"अर्ध्या तासानं या म्हणावं." मी म्हणालो.

परिचारिका गेली आणि मी पुन्हा भूतकाळात गेलो. अर्ध्या तासानं वार्ताहर येणार होते. त्यांना सगळं सुसंगत सांगणं आवश्यक होतं.

नीताच्या 'ॲबडोमेन्'मधील 'ग्रोथ' 'मॅलीग्नंट' आहे असं जेव्हा मला कळालं, तेव्हा मी केवढा गोंधळ घातला होता ! नीता मला सोडून कायमची होती !

अन खूप विचार करून मी निर्णय घेतला.

नीताचं शरीर 'प्रिझर्व' करून ठेवायचं !

त्यावेळी पाश्चात्य देशात नवीनच फॅड निघालं होतं. अनेक लक्षाधीशांनी आपली शरीरं मृत्युनंतर 'प्रिझर्व' करून ठेवायला सांगितली होती. 'वैद्यक शास्त्राच्या अपूर्ण ज्ञानामुळे आपल्याला मृत्यु यावा' ही गोष्ट या लोकांना मान्य नव्हती ! परंतु ज्यावेळी हे शास्त्र पूर्ण प्रगत अवस्थेला जाईल, त्यावेळी मृत्यु असणार नाही, अशी या लोकांची श्रद्धा होती. ज्या रोगामुळं मृत्यु आला,

## तितिपिता

यशवंत देशपांडे

जाणार, हे कबूल करायला मन तयारच नव्हतं. वाटेल ते झालं तरी हे होऊ द्यायचं नाही. असा निश्चय मी केला होता !

नीताची आई तिला दोन वर्षांची असताना सोडून गेली, तेव्हापासून नीताचा सांभाळ मीच केला होता. पित्याबरोबर मातेची पण भूमिका वठवली होती. दुसऱ्या लग्नाचा आग्रह निकरानं मोडून काढला होता. नीता आणि मी हेच जणू माझ्या आयुष्याचं समीकरण झालं होतं.

आणि नीताला कॅन्सर झाला होता ! ती मला सोडून कायमची जाणार त्यावर त्यावेळी उपाय करून घेऊन, पुनर्जीवन प्राप्त करून घेण्याची त्यांची जिद्द होती ! त्यासाठीच आपली निर्जीव कलेवरं त्यांनी जपून ठेवायला सांगितली होती त्यासाठी लागणाऱ्या अफाट धनाची व्यवस्था करून ते गेले होते !

यासाठी प्रदीर्घ काळ लागणार होता. परंतु त्याला या लोकांची तयारी होती. केवळ एकाच आशेनं त्यांना पछाडलं होतं. कुणीतरी अश्विनीकुमार त्यांना नवजीवन प्राप्त करून देणार होता.

या सगळ्याचं वर्णन मी 'फॅड' या

शब्दानं केलं होतं

नीताची आणि माझी या विषयावर खूप चर्चा व्हायची. B. A. फायनलला मानसशास्त्र घेऊन 'ॲपिअर' होणाऱ्या नीताशी चर्चा करताना मला जरा सावधच असावं लागायचं.

माझं या गोष्टीला 'फॅड' म्हणणं तिला मान्य नव्हतं! यात एकप्रकारचं 'थ्रिल' आहे असं तिला वाटायचं. निसर्गाशी झगडण्यात आणि त्याच्यावर विजय मिळवण्यात तिला अपूर्व आनंद वाटत होता!

माझं म्हणणं तिच्या अगदी उलट असायचं!

मृत्युवर विजय ही कल्पनाच मुळी मला पटत नव्हती. त्यामुळं अनेक प्रश्न निर्माण झाले असते. जीवनाचा प्रवाह खुंटला असता. निसर्गाबरोबर झगडा अवश्य करावा; परंतु शेवटी त्याच्याशी मिळवून घेण्यात शहाणपणा आहे असं माझं मत होतं. जन्म जितका नैसर्गिक तितकाच मृत्यु! सूर्योदयानंतर सूर्यास्त हवाच!

म्हणूनच "लाईफ इन्क्लूड्स डेथ!" असं माझं मत मी हिरीरीन मांडायचो! एक ख्यातनाम सर्जन या नात्यानं मी हीच गोष्ट अनेक सेमिनार्स आणि परिषदांमधून मांडली होती.

माझ्या या भूमिकेची नीता नेहमी टर उडवायची!

"डॅडी, मानसशास्त्राची विद्यार्थिनी म्हणून मी तुम्हाला सांगते, 'माणसाला कितीही दीर्घायुष्य असलं तरी कमीच वाटतं. अमरपद प्राप्त झालं तरी त्याला ते हवंच आहे.' आधी मृत्युवर विजय तर मिळवा! त्यामुळं निर्माण होणारे प्रश्न नंतर आपोआप सुटतील. स्वतः निष्णात डॉक्टर असून तुम्ही निसर्गाशी मिळवून घेण्याच्या गोष्टी कराव्यात याचंच मला नेहमी आश्चर्य वाटतं!" असं तिचं नेहमीचं म्हणणं असे.

अन् ती स्वतः आता थोड्या दिव- सांची सोबती आहे, हे तिला सांगायची पाळी माझ्यावर आली होती! अगदी जड अंतःकरणानं मी तिला सांगितलं! तिच्यापासून कोणतीच गोष्ट लपवून ठेवली नाही. 'प्रत्येक रुग्णाला आपल्या आयुष्याचा 'स्पॅन' जाणून घ्यायचा अधिकार असतो' हे तत्व मी नीताच्या, प्रत्यक्ष माझ्या मुलीच्या बाबतीत, अम- लात आणलं.

मला वाटलं त्यापेक्षा नीतानं सगळं 'इझिली' घेतलं.

माझ्या कल्पनेप्रमाणं त्याचवेळी 'आनंद' रिलिज झाला होता. त्यातल्या आनंदाचा कित्ता नीतानं हुबेहुब गिर- वला. तिचे उरलेले रिक्स, तिनं फारच हुशारीनं काढले. मला भास होऊ नये म्हणून तीच जपायची!

मी मात्र काळजीत होतो. तिचं शरीर मला 'प्रिझर्व' करायचं होतं. घरचा पैसा असला तरी अपुरा पडायची भीती होती. माझे कॉलेजचे सहकारी फारसे उत्सुक नव्हतेच! फक्त माझा हट्ट, म्हणून ते तयार होते.

आणि अखेर तो काळा दिवस उजाडला!

नीता मला सोडून गेली! वीस

वर्षांचा तिचा माझा सहवास संपला होता! खूप रडून घ्यावं वाटत होतं. पण त्याही गोष्टीत मी दुर्दैवी होतो.

मला रडायला वेळ नव्हता.

नीताचं शरीर मला 'प्रिझर्व' करायचं होतं.

मी आधीपासून तयारीतच होतो. तिच्या शरीरातलं सगळं रक्त 'ड्रेन' करून घेतलं. आणि निरनिराळ्या 'प्रपोर्शनच्या' 'अनहैड्रस' लिक्वीडनं ते रिप्लेस केलं. लगेचच तिचं शरीर द्रवरूप नायट्रोजनच्या तपमानाला ठेवून दिलं. आता तिचं हृदय 'सॉलिडिफाय' व्हायचा अन् "ब्रेन सेल्स्' 'डॅमेज' व्हायचा धोका नव्हता! काही मिनिटातच मी हे काम आटोपलं होतं. बारीकसारीक पुष्कळ गोष्टी माझ्या सहकाऱ्यांनी आणि विद्यार्थ्यांनी केल्या होत्या.

नंतर मला रडायला वेळ मिळाला होता!

डॉक्टरी पेशाला न शोभेलसं मी रडून घेतलं होत! शेवटी डॉ. बालानीनं माझी समजूत घातली होती. "Don't be silly सरदेसाई! एवढं रडायला काय झालं? तुझ्या दृष्टीनं नीता अजून जिवंतच आहे. तुझे प्रयोग ज्या वेळी 'फेल' होतील तेव्हा तू दुःख कर. आता ऊठ अन् कामाला लाग!"

त्या नंतरचा पंधरा वीस वर्षांचा इतिहास हा माझ्या जिद्दीचा अन् संघर्षाचा इतिहास होता! गेल्या वीस वर्षांत काळ किती बदलला होता? वैद्यकशास्त्र खूपच पुढे गेलं होतं! हार्ट व किडनी 'ट्रान्सप्लंटस' भाग पडून, त्याची जागा 'सिंथेटिक' अवयवांनी घेतली होती. कर्करोगाचा अभेद्य बुरुज ढासळला होता! माझ्या दृष्टीनं ही महत्त्वाची बाब होती. कारण नीता कर्क रोगानंच गेली होती. त्यावर उपाय उपलब्ध झाला होत. परंतु...

मृताला जिवंत करण्याचो संजीवनी मात्र अजून गवसत नव्हती! माझ्या धडपडीचं अंतीम लक्ष तेच होतं!

त्यासाठी त्यावर असलेलं सर्व साहित्य मी वाचलं! परिषदा आणि सेमिनार्स 'अटेंड' केले. जिथं जिथं म्हणून या विषयावर संशोधन चालू होतं, तिथं प्रत्यक्ष जाऊन चर्चा केली होती! त्याच वेळी माझं काम पण चालूच होतं.

आणि एके दिवशी 'क्लिनिकली डेड' म्हणून 'डिक्लेअर' झालेले 'गिनिपिगस्' माझं तंत्र वापरून मी जिवंत करून दाखवले. मृत झालेले पांढरे शुभ्र गिनिपिगस् माझ्या प्रयोगशाळेत आनंदानं बागडले!

जर्नलस् मधून माझं हे काम प्रसिद्ध झालं. अन् जगात एका 'कमोशनची' लाट ऊसळली! माझ्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला.

कोणीतरी नंतर बातमी आणली होती!

नोबेल पारितोषकाच्या 'पॅनेल'मध्ये माझं नाव होतं!

कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी तर मला डोक्यावर घ्यायचंच बाकी ठेवलं होतं! आतापर्यंत फारसे उत्सुक नसलेले सहकारी आता मात्र मदत करायला तत्पर होते.

पण माझं अजून समाधान झालं नव्हतं. माझ्या श्रमांचं चीज नीता जिवंत झाल्यावर होणार होतं. मी रात्रंदिवस खपत होतो. मला गिनिपिग-वरून माणसाकडे यायचं होतं.

माझ्या नीताला पुनर्जन्म द्यायचा होता !

माझी लाडकी नीता तर मला मिळणार होतीच ! पण जगाच्या इति-हासात आम्ही दोघं अजरामर होणार होतो ! तो दिवस उजाडण्याची मी उत्कंठेने वाट पहात होतो

तो दिवस आज उजाडला होता !

आतमधे नीता शांत झोपली होती ! मी डेव्हलप केलेलं तंत्र चांगलंच यशस्वी झालं होतं ! तिचं 'ब्लडप्रेशर' अगदी नॉर्मल होते ! या गतीनं ती साधारण पहाटे जागी झाली असती !

"डॉक्टर, पत्रकार, बाहेर तुमची वाट पहात आहेत."

परिचारिकेच्या वाक्यानं मला जाग आली ! अर्धा तास कसा गेला हे कळालं-सुद्धा नव्हतं !

"चल, मी पण तयारच आहे" मी म्हणालो.

मी अगदी नवीन असलो, तरी पत्र-कार परिषद चांगली झाली ! त्यांना समजावून सांगणं सोपं गेलं. त्यांच्या प्रश्नांना उत्तरं दिली.

पत्रकार गेल्यावर मी पुन्हा वॉर्डात गेलो. अर्ध्या अर्ध्या तासांनी नीताचं ब्लडप्रेशर तपासलं जात होतं. ती शांत झोपली होती, गेल्या पंधरा वर्षांत जवळ जवळ रोजच मी तिला पहायचो. पण आज मी विलक्षण भारावून गेलो होतो ! ती खरोखरची झोप घेते आहे ही कल्पनाच सुखद होती !

पंधरा वर्षांनंतर नीता मला भेटणार होती ! काय वाटेल तिला ? मला ओळखेल का ती ? नव्या जगात तिचं स्वागत कसं करायचं ? अनेक प्रश्न माझ्या मनात गर्दी करीत होते.

ती रात्र मी वॉर्डातच जागून काढली. माझ्या अंदाजाप्रमाणं नीता पहाटेच्या सुमारास जागी होणार होती. तिने डोळे उघडल्यानंतर प्रथम तिला तिचे आवडते डॅडी दिसायला हवे होते.

पहाटेच्या सुमारास माझ्या एका पदव्युत्तर विद्यार्थ्यानं वर्तमानपत्रांचा एक गठ्ठा माझ्यासमोर आणून ठेवला. सगळ्या वर्तमानपत्रांनी माझी कालची मुलाखत चांगली आठ कॉलमी मथळा देऊन छापली होती. दोन तीन वर्तमान-पत्रात त्याविषयी अग्रलेख होते. निसर्गा-विरुद्ध माझ्या लढाईचा मोठ्या कौतुकानं उल्लेख त्यांनी केला होता. मृत्युवर मानवानं मिळवलेल्या विजयानं निर्माण होणारे प्रश्न चर्चिले होते. एक गोष्ट मात्र सर्वांनीच आवर्जून सांगितली होती. नोबेल पारितोषकावर माझा रास्त हक्क होता !"

साधारण पाच वाजता माझ्या आयु-ष्यातील सर्वात महत्त्वाचा क्षण उगवला ! नीतानं डोळे किलकिले केले, प्रदीर्घ झोपेतून जागं झाल्याप्रमाणे आळस दिला अन् सवयीप्रमाणं हाक मारली. 'डॅडी.'

वॉर्डात एकच जल्लोष उडाला !

सर्वजण एकमेकांचं अभिनंदन करीत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एकच भाव होता. "मानवी इतिहासातील अतर्क्य घटना आमच्या वॉर्डात घडली होती. त्या घटनेला साक्षी होण्याचं भाग्य आम्हा सर्वांना लाभलं, हे आमचं भाग्य," असाच भाव जणू प्रत्येकाच्या डोळ्यातून डोकावत होता.

मी मात्र विलक्षण भारावून गेलो होतो. माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले होते! ज्या एका ध्येयानं प्रेरीत होऊन मी हा सारा खटाटोप केला होता, त्याची आज सांगता झाली होती. माझी नीता मला परत मिळाली होती!

त्यानंतरचे तीन आठवडे कसे गेले ते सांगताच येत नाही. नीताला तीन आठवडे हॉस्पिटलमधेच रहावं लागणार होतं. पूर्ण निर्जंतुकरण केलेल्या वॉर्डात तिला ठेवलं होतं. 'इरॅडेटेड' अन्न तिला द्यावं लागणार होतं. तिच्या प्रगतिकडे लक्ष तर आवश्यकच होतं. या सर्व गडबडीत तीन आठवडे अगदी तीन दिवसासारखे निघून गेले.

तीन आठवड्यानंतर मी नीताला घरी आणलं! कितीतरी लोक आम्हा दोघांना पहायला रस्त्यावर लोटले होते. नीता खऱ्या अर्थानं मृत्युंजय झाली होती. तिचं आणि माझं नातं आता केवळ मुलीचं आणि पित्याचं नव्हतं, त्याहून अधिक होतं. काय होतं, हे मात्र आम्हा दोघांनाही सांगता आलं नसतं. डॉ. बालानी तर थट्टेनं एक दोनदा म्हणाला सुद्धा, "सरदेसाई, तुला कलियुगातला शुक्राचार्य म्हणायला पाहिजे. त्या शुक्राचार्याला संजीवनी ठाऊक होती की नाही कुणास ठाऊक? पण तू मात्र संजीवनी मिळवलीस."

त्यानंतर जवळ जवळ महिनाभर, मला अन् नीताला, मोकळा वेळ कसा तो मिळाला नाही. मुलाखती, सभा अन् सम्मेलनं! अगदी थकून जायला व्हायचं! परंतु लोकांची उत्सुकता अजूनही संपत नव्हती! दोन महिन्यानंतर आम्ही दोघं जगप्रवासाला निघणार होतो. पण त्या आधी मला नीताशी सवडीनं बोलायचं होतं.

शेवटी नीताचाच जय झाला होता! मृत्युवर विजय मिळवण्यातलं 'थ्रिल' तिनं स्वत: अनुभवलं होतं! डॉक्टर म्हणून मी भूमिका घेतली होती, आणि तिचा सातत्यानं पाठपुरावा केला होता, ती शेवटी नीतानं मला सोडायला लावली होती. पित्यानं डॉक्टरावर मात केली होती!

म्हणूनच थोडा निवांत मिळाल्यावर, मी नीताजवळ याचा उल्लेख केला. त्यावेळी तिची 'रिॲक्शन' होती.

"ती चूक होती आणि माझंच बरोबर होतं."

तिचा हा रिस्पॉन्स' मला अनपेक्षीत होता. माझी अपेक्षा होती, ती म्हणेल "डॅडी, पहा तुम्हाला मी मत बदलायला लावलं की नाही. आहे की नाही 'थ्रिल'? पण हे कबूल करायला माझ्याकडून केवढी परीक्षा घेतलीत डॅडी? प्रत्यक्ष यमाच्या दरबारांत जाऊन आले मी!"

पण असं काही न म्हणता, नीता आता मी केलं ते चूक केलं असं म्हणत होती ! तिच्यासाठी मी केवढे श्रम केले असं म्हणत होती ! तिच्यासाठी मी केवढे श्रम केले होते ? सर्व जगानं माझं कौतुक केलं होतं. पण त्या सर्वांहून महत्वाचा कौतुकाचा शब्द होता नीताचा !

मी गप्प बसलेलो पाहून तिनं विचारलं,

"रागावलात डॅडी ? पण मला तुमच्याशी या विषयावर एकदा बोलायचं होतं. पण वेळच मिळत नव्हता." तिच्या मनात चाललेली खळबळ स्पष्टपणे तिच्या चेहऱ्यावर दिसत होती. म्हणून मग मीच तिला म्हटलं.

"नीता बेटी, अगदी संकोच करू नकोस ! सांग, काय म्हणायचं ते निःसंकोच सांग.'

"डॅडी, तुम्हाला आठवतं, मी तुम्हाला, नेहमी म्हणायची, मानसशास्त्राची विद्यार्थिनी म्हणून मी तुम्हाला सांगते, की माणसाला अमरपद हवच आहे. नुसत्या दीर्घ आयुष्यावर त्याचं समाधान होणार नाही." नीता म्हणाली.

"वा ! यावर तर आपले वादविवाद चांगलेच रंगायचे. तिला अगदी चांगलं बोलतं करायचं म्हणून मी म्हणालो.

"डॅडी, ग्रीक पुराणातली एक कथा तुम्हाला ठाऊक आहे ना ? एका बाईनं तिच्या मृत नवऱ्याला तप करून जिवंत केलं ! परमेश्वराजवळ वर मागून नवऱ्यासाठी अमरपद मिळवलं. तो अमर झाला. परंतु त्याचं म्हातारपण काही टळलं नाही. अमरपदाबरोबर, तारुण्याचा वर मागायचा राहून गेला. म्हणून तो म्हातारा होत गेला. जर्जर होत गेला, अन् लहान लहान होत गेला. इतका तो लहान झाला की त्यालाच त्या अमरपदाचा वीट यायला लागला ! शेवटी त्यानं आपण होऊनच ईश्वराकडे मृत्युची मागणी केली."

नीता अगदी तल्लीन होऊन सांगत होती. पण माझ्या लक्षात अजून तिच्या म्हणण्याचा आशय येत नव्हता.

ते लक्षात येऊनच की काय, नीता पुढे म्हणाली, 'डॅडी, माझं सांगणं सुसंगत असेल की नाही कुणास ठाऊक ? मी प्रयत्न करीन; पण तुम्ही समजावून घ्या. माझी स्थिती त्या कथेतील माणसासारखी झाली आहे. तुम्ही माझ्यावर जिवापाड प्रेम केलंत. कोणत्याही पित्यानं आपल्या कन्येसाठी केलं नसेल एवढं माझ्यासाठी केलंत. त्यासाठी मी तुमची कशी उतराई होऊ समजत नाही. पण तरीही डॅडी, मला वाटतं तुम्ही हे सर्व करायला नको होतं. मृत्यु जीवनाइतकाच नैसर्गिक आहे. तुम्हीच तर म्हणत होता, मग माझ्याच बाबतीत तो अनैसर्गिक का मानलात ? का मला परत आणलत या जगात ?"

"नीता, तुला कॅन्सर होईपर्यंत माझं हे मत कायम होतं." मी नीताला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; पण ऐन विशीत, जीवनाच्या ऐन बहारात, एखाद्याला उठवून नेणं हे कुठल्या निसर्ग

क्रमाला अनुसरून आहे? तू माझा शेवट पहाणं हे नैसर्गिक की मी तुझा पहाणं?

"कबूल डॅडी, एकदम कबूल!" नीता म्हणाली. तसं झालं असतं तर ते निसर्गक्रमाला अनुसरून झालं असतं; पण प्रत्येक नियमाला अपवाद हा असतोच ना? सगळंच सुरळीत कसं चालायचं? थोडेसे अपघात हे होणारच! आपण त्यांची सवय करून घ्यायला हवी! तुमच्या पूर्वीच्या भाषेत, आपण निसर्गाशी तडजोड करायला हवी.

"म्हणजे आता आपल्या बाजू फक्त बदलल्या आहेत. चर्चा तीच चालू आहे" मी काहीशा लाइट मूडमधे म्हटलं.

"डॅडी टेक इट सिरियसली!" नीता म्हणाली. तिच्या आवाजाला आता वेगळीच धार चढली होती. तुम्ही माझ्यासाठी जे केलंत, त्याचे पांग कसे फेडू, हे मला समजत नाही; हे मी आधीच सांगितलंय. कृपा करून गैरसमज करून घेऊ नको! पण असं करणं किती मुलींच्या बाबतीत, पित्यांना शक्य आहे? ही झाली एक बाजू. दुसरी बाजू याहून अधिक भीषण आहे. निसर्गानं आपल्याला चकवलं आहे. मी तुम्हाला सोडून जावं अशी त्याची इच्छा होती. तुम्ही ते नाकारलंत अन् आपलं सर्व कसब पणाला लावून मला नवजीवन दिलंत, पुन्हा या जगात आणलंत! निसर्गाला आव्हान दिलंत, मृत्यूवर विजय मिळवलात!

"पण तुमचं हे समाधान खोटं आहे डॅडी! मी आज तुम्हाला जिवंत दिसते आहे. अगदी वीस वर्षाच्या अल्लड तरुणीसारखं. मी अवखळ वागावं अशी तुमची इच्छा असते. पण माझ्यानं ते होत नाही. तुम्ही माझं शरीर 'प्रिझर्व' केलंत, पण माझं मन? ते वाढतच होतं. अन् मी आज मनानं चाळीशीची आहे. शरीर वीस वर्षांचं पण मन मात्र चाळीस वर्षाचं! शारीरिक अन् मानसिक वयाचा सुसंवाद कसा जमायचा?"

नीताचं म्हणणं आता माझ्या लक्षात येत होतं. विलक्षण गुंतागुंत झाली होती. ऐन विशीच्या शरीरात मन मात्र होतं चाळीसच्या पुढचं! त्यातले धोके माझ्यासमोर येत होते. निसर्गानं माझ्यावर एक प्रकारे सूडच उगवला होता. मी जिंकलो होतो तरी पण मी हरलो होतो! मानवात आणि गिनीपिगमधे काही फरक असेल हे मी माझ्या धुंदीत विसरलो होतो!

नीता सांगतच होती. 'डॅडी, तुम्ही मला पण एक गिनिपिग समजलात! मला काही भावना असतील याचा तुम्हाला विसर पडला. निसर्गानं नेमकं ते हेरलं.'

परंतु माझं आता तिच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतं. सगळं जग माझ्या भोवती गरगर फिरतंय असं वाटतं होतं. प्रयोगशाळेत गिनिपिग्स आनंदाने बागडत होते. अन् समोरच्या भिंतीवरच्या कॅलेंडरचं पानं वाऱ्यानं फडफडत होती!

● ● ●



जबानी चौथी । शेवटची
हप्ता दहावा, शेवटचा

लेखक : नारायण सान्याल
अनुवादक : अशोक शहाणे

सकाळी साडेसात वाजता पाकिस्तानी कैद्यांना घेऊन रवाना झालो. आत्तेरी गावापासनं चार पूर्णांक सदतीस शतांश किलोमीटर अंतरावर असलेल्या दर्ग्याच्या दिशेनं. दरगा होता पूर्वेच्या टोकाला. तिथनं शंभरेक यार्ड अंतर गेल्यावर मी गाड्या थांबवल्या.

त्याचवेळी पलीकडनं—म्हंजे पश्चिमेकडनं—शंभरेक यार्ड अंतरावर चार पाकिस्तानी आर्मर्ड कार्स येऊन थांबल्या.

आमच्या बरोबरच्या लोकांना तिथंच थांबायला सांगून मी फक्त ॲडज्युटंटलाच तेवढं बरोबर घेऊन दर्ग्याकडे निघालो.

तिकडे शत्रूचं सैन्यपण आमच्यासारखंच डबल लाइनमधे उभं राह्यलं. आपल्या सैनिकांना अटेन्शनमधे उभे करून त्यांचा उंचाडया कमांडर तेवढा पुढं यायला लागला खंबीर पावलं टाकत. बरोबर फक्त एडिकाँग.

लेफ्ट-राइट-लेफ्ट-राइट-लेफ्ट !

हॉल्ट !

चालू लेखमाला

# मी नेताजींना बघितलंय

दोघं समोरासमोर उभे राह्यलो. लांबलचक एकोणीस वर्षांनंतर !

(हॅत् ! काय म्हातारा होऊन गेलाय् अन्वर ! केस बिलकुल पिकलेय्त ! नजर मात्र अजून पूर्वीसारखीच तेज आहे ! अन् कपाळावर ती जखमेची खूण पण आहे की ! )

--मला आशा आहे, इंडियन आर्मीच्या १।४ पंजाब रेजिमेंटच्या कर्नल हरगोविंदसिंगबरोबरच बोलायचं भाग्य मला लाभलेलं आहे ! मी पाकिस्तानच्या दोन नंबर डिव्हिजनचा ब्रिगेडियर महंमद अन्वर हुसेन !

--आपल्या भेटीनं फार आनंद झाला ! हो, मीच कर्नल हरगोविंदसिंग ! आणि हे माझे अॅडज्युटंट लेफ्टनंट जीवनसिंग !

--माझे एडिकाँग लेफ्टनंट दिलदार अहंमद !

आम्ही एकमेकांचा हात हातात घेतला.

(बोलायला तोंड उघडल्या-उघडल्याच--तू पण उघडा पडलास की रे अन्वर ! एक दात तू सोन्याचा बसवलायस ! म्हंज तुझे दातपण पडायला लागले बेट्या ! म्हातारा झालास तू ! )

--कैद्यांची यादी तुम्ही बरोबर आणली असेल अशी मला आशा आहे. ती एकदा बघायची संधी मला मिळेल का ? लेफ्टनंट अहंमद, आपली यादी कर्नल सिंगना दे !

(लेकाचा माझ्या दाढीमिशांच्याकडे का म्हणून पहातोय् सारखा सारखा ? मी कलप वापरतो असं वाटतंय् का काय त्याला ! )

दोघांनीही एकमेकांच्या याद्या ताडून घेतल्या. कागदपत्र सगळे ठीकच आहेत. आता नाव घेतली की एकेकानं इकडनं तिकडं जायचं.

मी म्हणालो--माफ करा ब्रिगेडियर हुसेनसाब, ही देवाण-घेवाण कशी व्हावी असं तुम्हाला वाटतं ? गटानंच इकडले कैदी तिकडे जाऊ देत न् तिकडले कैदी इकडे येऊ देत ?

ब्रिगेडियरसाहेब म्हणाले—तुमची परवानगी असेल तर मी म्हणेन, ह्यानं फार घोटाळा होईल. त्यापेक्षा आपण आपापल्या बाजूच्या लोकांना पंच्याहत्तर यार्ड पुढं यायला सांगू या. दोघांच्यात पन्नास यार्डांचं अंतर राहील. मग मी आणि आपण एकेकाचं नाव घेऊ या. म्हणजे तिकडला एक कैदी इकडे येईल

आणि इकडला एक कैदी त्याचवेळेस तिकडे जाईल.

मी म्हणालो—ह्या पद्धतीला माझं संपूर्ण अनुमोदन आहे.

(बेटचाला पोरंबाळं काय आहेत? त्यांना पण मिलिटरी स्कूलमधेच घातलंय् का काय?)

—तर मग तसंच होऊ दे!

झालंही पण तसंच. अर्ध्या तासाच्या आत कैद्यांची देवाणघेवाण पार पडली.

परत आम्ही एकमेकांचा हात हातात घेतला. आता निरोप घ्यायचा. मला दिसलं, वेडा अन्वर खूप बेचैन होऊन गेलाय्! माझ्याही मनात तेव्हा प्रचंड वादळ उठलं होतं पण लष्करी शिष्टाचाराचा बर्फ कसा काय फोडून काढणार? तो तरी काय करणार?

पण अखेर मला अगदीच राहवलं नाही. मी इंग्रजी झुगारून दिलं. किंचित हसून चक्क हिंदुस्थानीत म्हणालो— फिकिर मत कीजिये ब्रिगेडियरसाब! फिर मिलेंगे हम दोनो!

त्याचेच शब्द! त्यालाच परत केले! दरवेळी निरोप घेताना हेच म्हणायचा तो! 'फिर मिलेंगे हम दोनो!' म्हणून हे शब्द वापरून तरी बर्फ वितळतोय् का बघू या म्हटलं!

पण नाही! बर्फ काही वितळलं नाही! लष्करी उपचारापासनं रेसभरही ढळले नाहीत ब्रिगेडियर महंमद अन्वर हुसेन! किंचित हसलेदेखील नाहीत! इंग्रजीतच जबाब दिला त्यांनी.

—नाही! अल्लाकडे प्रार्थना आहे माझी — हे दुर्दैव माझ्या वाटयाला नको यायला!

मला धक्काच बसला! पण नाही! आमची दोस्ती तिळभरदेखील कमी झालेली नाही! ह्या हरगोविंदच्या न् अन्वरच्या दोस्तीत ह्या एवढयाशा बोलण्यानं काही चीर जाणार नाही. ह्याच्यापेक्षा हजारपटींनी कडक शब्द आम्ही बोललो होतो एकमेकांना—एकेकाळी!

धक्का बसला तो माझ्या लष्करी इभ्रतीला! कैद्यांच्या देवाणघेवाणीच्या रंगमंचावर ब्रिगेडियर अन्वर हुसेन मला अपमानास्पद शब्द बोलले आपल्या सहकाऱ्याच्या देखत — अन् माझ्या अॅडज्यूटंटच्या समोर! ह्याचा विरोध न करून चालण्याजोगं नव्हतं मला!

कडक आवाजात मी म्हणालो—म्हणजे काय म्हणायचं आहे आपल्याला!

ब्रिगेडियर अन्वर हुसेननी इंग्रजीतच उत्तर दिलं—काही विशेष नाही कर्नल? पण आपली भेट होणार तो ह्या सरहद्दीवरच ना? तुमचं तोंड पश्चिमेला न् माझं तोंड पूर्वेला! अशी भेट झाली नाही तरच आनंद होईल मला!

ह्या उत्तराला काही तोडच नव्हती!

म्हणालो—अच्छा, तर चलू मी?

आता अन्वर खूप अगतिक झाल्यासारखा वाटला. किंचित् चुळबुळ करत तो म्हणाला—तुमच्याशी एकांतात काही गोष्टी बोलायच्या होत्या. तुम्हाला फुरसत होईल का? काही अडचण तर नाही ना व्हायची तुमची?

—मुळीच नाही!

—या तर मग !

कमरेच्या पट्ट्यातनं रिवॉल्वर काढून त्यानं आपल्या सहकाऱ्याच्या हातात दिलं.

मीपण माझं रिवॉल्वर जीवनसिंगकडे देऊन अन्वरच्या मागोमाग गेलो.

पंचवीसेक यार्ड उत्तरेला आल्यावर अन्वर थांबला. मीपण. हसलो. आम्ही दोघंही.

शेवटी अन्वर म्हणाला— कसा आहेस ?

—ठीकच आहे मी. तू ? लग्न केलंस ?

—अरे, त्याला तर वीस वर्षं होऊन गेली जवळजवळ ! दोन मुलं न् एक मुलगी आहे. मुलगी मोठ्ठी ! लग्नही झालं तिचं ! मुलगा शिकतोय् कराचीला. तू ?

—मी काय ?

—लग्नबीग्न केलंय्स ? मुलंबाळं ?

—नाही ! मी काही परत फंदात अडकवून घेतलं नाही स्वत:ला !

—ओ !

परत थोडावेळ गप्प !

नाही ! बर्फ काही वितळत नाहीय् !

अन्वरनंच परत सुरुवात केली.

—तिचा काही ठावठिकाणा लागला नाही ना ?

—नाही !

—तर मग आणखी वाट बघून काय फायदा ! वयपण बरंच झालं की !

—जाऊ देत ह्या सगळ्या गोष्टी !

—बरं ! मग कोणत्या गोष्टी बोलू या ? हवापाण्याच्या गोष्टी ?

हेपण ठीकच आहे की ! मग बोलायचं तरी काय ? काळीज भरून इतक्या गोष्टी सांचल्यायत की काय बोलावं ते सुचतच नाहीय् ! खरंतर बर्फ अजून वितळलेलं नाही म्हणूनच असं होतंय् ! हे बर्फ वितळवून टाकायचा एकच उपाय होता. व्याकूळ होऊन मी तिकडेच झुकलो.

म्हणालो—दोस्त ! माझी एक विनंती मानशील ?

—तुझी कोणती विनंती मी मानलेली नाही, सांग बरं हरगोविंद ?

—बरं ! इथं तर काही आणखी कुणी नाही ! तू न् मी दोघंच ! चल ! निरोप घ्यायच्याआधी परत एकदा हात मिळवू या अन् एकमेकांना परत एकदा तो बीजमंत्र ऐकवू या ! दोघंही एकदम 'जयहिंद' म्हणू या !

पुरतं एक मिनिट अन्वर काहीच बोलला नाही. तो गप्पच राहिला. त्याचा चेहरा मलूल होऊन गेला. खिशातनं रुमाल काढून तो तोंड पुसायला लागला.

इतका कसला विचार करतोय् हा ?

मी हात पुढं केला.

दोन्ही हात खिशांत घालून अन्वर ताठ उभा राहिला. नंतर प्रत्येक शब्द स्वच्छ उच्चारात तो सावकाश म्हणाला —दोस्त ! मला माफ कर !

—म्हंजे तू 'जयहिंद' म्हणणार नाहीस ?

—ते काही आता जमायचं नाई भाई ! मला ते शक्य नाही !

—का म्हणून ?

अन्वर निरुत्तर !

माझ्या डोक्यात कळ आल्यासारखं होत होतं ! सरदार-इ-जंग महंमद अन्वर हुसेन एकांतात देखील मला 'जयहिंद' म्हणून शुभेच्छा द्यायला तयार नाही ! लांबलचक एकोणीस वर्षानंतर माझी ही शेवटची विनंती पण मानत नाही तो आज !

व्याकूळ होऊन मी म्हणालो--हा मंत्र उच्चारून तू मरायला पण तयार होतास एकदिवस !

--होतो ! पण त्याचं काय ?

--मग आज पण एकदातरी 'जयहिंद' का म्हणून म्हणता येत नाही तुला ? ह्या 'हिंद' म्हंजे काही सध्याचा हिंदुस्थान नाही अन्वर ! ह्या 'हिंद'मधे पश्चिम पंजाब आहे, सिंध आहे, सरहद्द प्रांत आहे, पूर्व बंगाल आहे !

--पण तरी ते जमायचं नाही दोस्त! तू मला माफ कर !

एकदम माझ्या डोक्यात रक्त चढलं !

दातओठ खाऊन मी म्हणालो -- ठीक आहे ! माफच करतो तुला ! पण हा गुन्हा काही माफ करण्याजोगा नाही !

अन्वरचे दोन्ही डोळे पेटून उठल्यासारखे झाले.

म्हणाला--म्हंजे ?

--म्हंजे त्यावेळी चुकीच्याच माणसाला सरदार-इ-जंग केलं होतं ! आझाद हिंद सैनिक व्हायची लायकीच नव्हती तुझ्यांत !

खिशातनं अन्वरचे दोन्ही हात बाहेर आले. दोन्ही पंजांच्या मुठी वळल्या त्यानं. वाघाएवढे पंजे !

म्हणाला--असं काय ! ठीक आहे ! मी एक लायक नव्हतो ! कबूल ! पण तू तर लायकच होतास, नाही का ? तू तेवढा खराखुरा सरदार-इ-जंग आहेस ना ? आझाद हिंद सेनेच्या सगळ्या लष्करी घोषणा द्यायला तयार आहेस का तू आज ?

--हो ! का नाही !

--ठीक ! तर मग मी तुला आमंत्रण देतो सरहद्दीच्या ह्या बाजूला यायचं ! इथं उभं राहून पूर्वेला तोंड करून माझ्याबरोबर आवाज मिळवून 'चलो दिल्ली !' म्हण बघू !

आवेगानं थरथर कापत होता अन्वर !

न थांबता तो बोलतच होता--हा मंत्र उच्चारून तू पण एकदिवस माझ्या खांद्याला खांदा भिडवून मृत्यूची तमा न बाळगता धाव घेतली होतीस ! जमत असेल तर दे ना ही घोषणा ! मी एकटाच नाही, माझ्या तुकडीतील सगळेच तुझ्या आवाजात मिसळून गातील--'चलो दिल्ली पुकारके, कौमे निशान सम्हालके, लाल कीलेपे गाडके, लडाये जा लडाये जा !

काय जबाब देणार मी ?

आता गप्प बसायची पाळी माझी होती ! आम्ही दोघंही गप्प झालो. बर्फ वितळला होता ! पण दोघांच्याही अंतःकरणात इतका डोंगराएवढा बर्फ साचून गेला असेल, ह्याची कल्पना नव्हती कुणालाच ! अन् हा बर्फ जणू उत्तर ध्रुवावरला बर्फ होता ! बर्फ

वितळून आलेल्या पुरात आम्ही दोघंही वहात होतो.

मी तिखटपणानं म्हणालो—तू काहीही म्हण अन्वर, पण युद्धबंदीचा हुकूम जारी झाल्यापासनं न् आमच्या जवानांनी अमृतसरहून ॲटॅक गन्स हलवल्यावर तुम्ही असं अमृतसरवर बॉंबिंग करणं म्हंजे मला—

—जाऊ दे हरगोविंद! त्याच्याबद्दल चर्चा करायची काही ही जागा नाही!

—नसणारच की! कारण ह्या गोष्टीचं काहीच समर्थन करता येणं तुला शक्य नाही ना! काश्मीरमधे सार्वमत होत नाही म्हणून तुम्हाला झोप येत नाही, पण सबंध पाकिस्तानात साध्या निवडणुकादेखील—

परत मला थांबवून अन्वर म्हणाला—हरगोविंद, मी तुला परत सांगतोय् की त्याच्याबद्दलची चर्चा करायची ही जागा नव्हे! तुला इच्छा असेल तर ह्याचीही चर्चा आपल्याला करता येईल!

—कधी? कुठं? न् कशी?

—ठीक! तो जबाबदारी माझ्यावर लागली! मी तुला सगळी कैफियत देईन! मग तर झालं?

—तर मग 'जयहिंद' काही म्हणत नाही आपण दोघं?

—नाही! कारण तूही 'चलो दिल्ली' म्हणायला तयार नाहीसच!

—म्हंजे शुभेच्छा न देताच निरोप घ्यायचा?

—नाइलाज आहे!

अंतःकरण जड होऊन गेलं. असं बाजूला जाऊन आम्ही एकमेकांशी बोललो नसतो तर बरं झालं असतं. कारण ह्या बोलण्यानं उगाउगा कडवटपणाच तेवढा वाढला. मला तेव्हा भलताच राग आला होता. चिडून गेलो होतो मी. अन् रागाच्या भरातच भलतेसलते आरोप करून बसलो अन्वरवर. खूप कडवटपणानं बोललो त्याच्याशी.

पण कॅंपमधे परतल्यावर वाटायला लागलं—अन्वरचं म्हणणं ठीकच आहे की. खरोखरीच ह्या एकोणीस वर्षांत गंगेतनं खूप पाणी वाहून गेलंय्—सिंधूतनंदेखील. तर मग त्यानं 'जयहिंद' कसंकाय म्हणावं? तो अजुनी लालकिल्ल्यावर झेंडा फडकवायचीच स्वप्नं पहातोय्! 'कदम कदम बढाये जा' हे संचलनगीत मी कुठं गातोय् आज? पण हे गाणं तो अजून म्हणतोय! हे गाणं गातगातच तो आला होता कराचीपासनं आत्तेरी गावापर्यंत!

परत फिरायचा हुकूम हाती आलाय्. मूठभर लोक ह्या पिलबॉक्सेसमधे ठेवून बाकीचे सगळे परततील. आधी अमृतसर. तिथनं दिल्ली. किंवा आणखी कुठंतरी.

छावणी उठवायची तयारी चालल्याय्. एकेका ट्रकमधनं आमचे सैनिक मागं फिरतायृत. फील्डग्लासेस डोळ्यांना लावून दिसतय्—त्यांच्याकडेपण हीच धांदल चालल्याय्. सरहद्दीवर दोन्ही पक्ष परतायच्या तयारीत गुंतलेयृत.

कॅंपच्या समोर इझिचेअरमधे पडल्यापडल्या दुर्बिणीतनं त्यांची गडबड मी बघत होतो.

आता ह्या आयुष्यात तरी काही अन्वरची गाठ पडायची नाही. गाठ पडावी असं वाटतच नाही त्याला. अन्वर म्हणाला ते ठीकच होतं. परत भेट न होणंच बरं.

पण तरी ह्या छोटयाशा भेटीत देखील अन्वरनं माझ्या मनाला एक जबरदस्त हादरा दिला होता. एक दार गेली एकोणीस वर्षं बंद होतं. गंज चढला होता ह्या दारावर. ह्या दारावरच धक्का दिला होता अन्वरनं.

बऱ्याच दिवसांत 'तिची' आठवण झाली नव्हती. लढाई संपल्यावर सुभद्रेचा काही पत्ता लागला नाही मला.

मी कैदी बनून भारतात आलो होतो. पंचेचाळीसच्या डिसेंबरमध्ये सुटलो मी. तिथनं कलकत्त्याला परतलो मी. भवानीपूरला. दहा वर्षांनी. आश्चर्यानं थक्क होऊन गेले सगळेच, आपला पोरगा परत मिळाल्याच्या आनंदात अम्माजींच्या डोळ्यातनं आसवांच्या धारा लागल्या. त्या थांबेचनात. पण कलकत्त्यात जास्ती दिवस राहवलं नाही. माझ्याच्यानं.

परत ब्रह्मदेशात गेलो. खूप तकलीफ झाली. ब्रह्मदेश-मलायात खूप भटकलो. रंगून, मौलमीन, बँकॉक, सिंगापूर ! पण कुणाकडनंच काही पत्ता लागला नाही. पायीपायी मौलमीनला यायच्या वेळेला बऱ्याचजणांनी तिला पाह्यलं होतं. नंतर म्हणे ती एकटीच निघाली सिंगापूरला जायला ! रंगूनच्या मुलींच्या शाळेतल्या एका शिक्षिकेनं ही खबर दिली. ही मद्रासी मुलगी पण तिच्याच तुकडीत होती. काय नाव होतं बरं तिचं ?——विसरून गेलोय् आता. तिनंच सांगितलं की सगळे नको-नको म्हणत असताना पण सुभद्रा एकटीच सिंगापूरला जायला निघाली होती. तिची रायफल होती तिच्याबरोबर.

सिंगापूरला पोचता आलं नाही बहुतेक तिला. ब्रह्मी गोरिलांच्या हातनं मारली गेली असेल. किंवा मग ब्रिटिशांच्या हाती सापडली असेल. कैद्यांच्या यादीत मात्र तिचं नाव मला सांपडलं नाही. कदाचित् तिचं रूपच वैरी ठरलं असेल तिचं. किंवा मग रायफलमधलं शेवटचं बुलेट स्वतःवरच चालवलं असेल तिनं !

ब्रिजलालजींचा पत्ता मात्र लागला होता. सिंगापूरच्या वेडयाच्या इस्पितळात. धंदा आता त्यांच्या हातात राह्यला नव्हता. ब्रिजलालजींचा अॅटर्नी मात्र सज्जन निघाला. ब्रिजलालजींना आयुष्यभर इस्पितळात ठेवायची व्यवस्था केली त्यांनी. करोडपती ब्रिजलालजींना रस्त्या-रस्त्यावरचे उकिरडे चिवडून जगावं लागत नाहीय् एवढंच काय ते सांत्वन.

मी त्यांच्यासमोर जाऊन उभा राह्यलो होतो. गढूळ, धुकाळलेले दोन डोळे ! मला ओळखलं देखील नाही त्यांनी !

——सर !

——कोण ? ओ ! जीवनसिंग ! काय खबर आहे ?

——तुमचं एक पत्र आहे सर. ब्रिगेडियर महंमद अन्वर हुसेनकडनं आलंय्.

खासगी पत्र आहे. पत्र घेऊन येणारा थांबलाय्. तो उत्तर घेऊन जाणाराय्.

जीवनसिंगच्या हातातनं सीलबंद पाकिट घेऊन मी म्हणालो--त्याला जायला सांग. उत्तर द्यायचं असेल तर म्हणावं इकडनं मी पाठवीन कुणालातरी.

अन्वरचं पाकिट हातात घेतल्यावर मन अगदी हलकं झालं. म्हंजे छावणीत परतल्यावर अन्वरपण माझ्यासारखाच उदास होऊन गेला असला पाह्यजे! त्याच्या लक्षात आलं असेल, मला भलताच धक्का बसलाय्. म्हणून माफी मागण्याकरता म्हणूनच हे पत्र पाठवलं असेल त्यानं. शिवाय माझा समाचार विचारला असेल. स्वतःच्या कौटुंबिक गोष्टी कळवल्या असतील.

लगेच पाकीट फोडून पत्र वाचायला लागलो.

पण नाही! निराशच व्हावं लागल. दोस्ताची माफी मागण्याकरता म्हणून काही अन्वरनं हे पत्र लिहिलं नव्हत. हे पत्र लिहिलं होतं एका पाकिस्तानी सेनापतीनं एका भारतीय नागरिकाला.

त्यानं लिहिलं होतं--

तू दोन आरोप केलेय्स. अन् माझ्याकडनं कैफियतीची मागणी केल्याय्स. तुला जबाब देईन असा शब्द मी त्याचवेळी दिला होता. तर कैफियत मी देईनच. फक्त त्याच्याआधी माझ्या काही प्रश्नांची उत्तरं तेवढी तू देऊन टाक. ह्या प्रश्नांना तुझी उत्तरं मला मिळाली म्हंजे मग पूर्वीच्या आझाद हिंद सेनेचा एक सैनिक म्हणून माझ्याकडून काही कैफियत मागायचा तुला कितपत अधिकार आहे, ह्याचा मला उलगडा होऊन जाईल.

माझे प्रश्न असे--

१. एकोणीसशे एकोणपन्नास साली मुंबईला भरलेल्या आझाद हिंद रॅलीत आपण एक ठराव पास करून सरकारला विनंती केली होती -- की 'लालकिल्ल्याच्या मुख्य दरवाज्याच्या समोर नेताजींचा एक सबंध संगमरवरी पुतळा बसवण्यात यावा.' हा ठराव आपण तुमच्या त्यावेळच्या प्रधानमंत्र्यांना--पंडित जवाहरलाल नेहरूंना पाठवला होता. ह्या विनंतीची हेटाळणी झाली ती का म्हणून? हा सन्मान करावा इतकी नेताजींची लायकी नव्हती म्हणून? का पैसे नव्हते म्हणून? का तुमचे भारत-भाग्य-नियंते मत्सराच्या विषानं जर्जर झाले होते म्हणून?

२. शिवाय ह्याच पत्रात आपण आणखीही एक विनती सरकारला केली होती -- की 'सिंगापूरच्या समुद्रकिनाऱ्यावर आझाद हिंदसेनेच्या शहीदांच्याकरता नेताजींनी एक स्मृतिस्तंभ उभारला होता. अन् ब्रिटिश-इंडियन सैन्यानं सिंगापूरात पाऊल ठेवल्या-ठेवल्या अॅडमिरल माऊंटबॅटनच्या हुकमावरनं हा स्मृतिस्तंभ जमीनदोस्त करण्यात आला होता. आता हुबेहूब तसाच शहीदमिनार लालकिल्ल्यात--शक्यतर दिवाण-इ-आमच्या समोरच्या मोकळ्या जागेत उभारण्यात यावा.' ही विनंतीदेखील ह्या सोळा-सतरा वर्षांत उपेक्षितच का म्हणून राह्यलेली आहे? हेही काय पैशाच्या तंगीमुळंच?

जाता जाता एक सुचलं म्हणून सागतो—

गेल्या महायुद्धात पूर्व आशियाच्या रणांगणावर ज्यांना क्षमा नाही असे चार वॉर-क्राइम्स झाले, असं अय्यर-साहेबांनी कुठंतरी लिहिलंय्. माझ्या मतानं अक्षम्य गुन्हे चार नाहीत. पाच आहेत! पाचवा गुन्हा केलाय् स्वतंत्र भारताच्या पहिल्या प्रधानमंत्र्यांनी! स्वतंत्र भारताच्या पहिल्या गव्हर्नर-जनरलबरोबर जाऊन ह्या मोडक्या मिनारावर हार चढवायचं नाटक करून! भारताच्या आत्म्याचा शोध घेण्याइतकं पांडित्य ज्यांच्याजवळ होतं, त्यांना किमान इतकं तरी ठाऊक असायला हवं होतं — की ह्या माऊंट-बॅटनच्या हुकमानंच हा मिनार पाडला गेला होता, अन् त्यांच्याच हुकमावरनं तो परत बांधणं शक्य झालं नव्हतं.

३. रासबिहारी बोस नावाचा कुणी-एक गृहस्थ जेव्हा जपानमधे मरण पावला, तेव्हा आपली शवटची इच्छा त्यांनी सांगितली होती—'भारताला माझी एकच विनंती आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावर माझ्या अस्थी जपानमधनं भारतात नेल्या जाव्यात. स्वतंत्र भारताच्या भूमीतच माझ्या अस्थींना समाधी मिळावी!'—ह्या गृहस्थाची ही शेवटची इच्छा काय म्हणून मानली गेली नाही? का ह्यालाही पैशाची तंगीच आड आली?

४. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर विएन्नाहून श्रीमती एमेली बोस ह्यांनी भारतात यायची आपल्याला इच्छा आहे असं कळवलं होतं. कोणत्याही प्रकारे भारताची सेवा करावी अस त्यांना वाटत होतं. ही त्यांची विनंती का म्हणून ऐकली गेली नाही? पैशाच्या तंगीमुळंच?

५. ''पैशाची तंगी' हेच वरच्या चारी प्रश्नांचं एकमेव उत्तर असेल, तर मग माझा पाचवा प्रश्न असा आहे—अंदमान अन् निकोबारची नावं बदलून नेताजींनी जी नवी नाव ठेवली होती, ती भारतानं काय म्हणून नाकारली? इथं तर काही पैशाच्या तंगीची सबब टिकण्याजोगी नाही! मग काय! मग काय 'स्वराज' अन् 'शहीद' ह्या शब्दांचा राज्यकर्त्यांना वैताग आला होता? का ज्यांनी ही नावं निवडली होती, त्यांना सहन करता आलं नाही म्हणून?

६. माझा शेवटचा प्रश्न—३०–४–१९४६ ला नव्या दिल्लीच्या जनरल हेडक्वार्टर्सहून निघालेला लष्करी हुकुम-नामा 126837 / Res / 4.1 अन् वट-हुकूम XXXVI—हे दोन्ही हुकूम ह्या सोळा वर्षांत देखील स्वतंत्र भारताला का म्हणून रद्द करता आले नाहीत? इथं तर काही अभाव पैशाचा नव्हता! अभाव होता आंतरिक इच्छेचा! हे दोन हुकूमनामे काय होते ते तू एव्हाना विसरून गेला असशील. नाही का? माझी तुला विनंती आहे. आय-एन-ए ॲडव्हायजरी कमिटी अन् अखिल भारत आझाद हिंद अनुसंधान समितीनं १४–४–१९५१ रोजी तुमच्या प्रधानमंत्र्यांना—म्हंजे परत पंडित जवाहरलाल नेहरूंना—लिहिलेलं पत्र

तू वाचून बघ.

तर कर्नलसाहेब ! निव्वळ 'चलो दिल्ली 'च नाही, तू स्वत:देखील आज 'जयहिंद' अशी घोषणा देऊ शकत नाहीस ! हे दोन हुकूमनामे जोपर्यंत मागं घेतले जात नाहीत, तोपर्यंत तूदेखील पूर्वीचा आझाद हिंद सैनिक म्हणून आज स्वतंत्र भारताचा शत्रूचं आहेस ! हे दोन्ही आदेशनामे जारीच असल्यामुळं 'जयहिंद' घोषणाही भारत सरकारला निषिद्धच आहे !

दोस्त अन्वरच्या ह्या पत्राचा काहीच जबाब मी दिला नाही. मी काही फारसा शिकला-सवरलेला नाहीच. लहानपणीच मला वडिलांनी शाळेतनं काढून मोटार दुरुस्तीचं काम शिकवलं होतं. तेव्हा ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मला कशी काय ठाऊक असणार? कुणी पंडित, हुशार माणूसच अन्वरच्या ह्या कूटप्रश्नांना उत्तर देऊं शकेल !

थोडक्यात काय, तर आमच्या दोघांच्यात रॅडक्लिफसाहेबानं जी एक रेघ मारून ठेवल्याय्, तिच्यामुळं आम्ही परत जुळून यायची काही शक्यता नाही. East is East, West is West — Never the twin shall meet !

अन्वर म्हणाला होता तेच खरं. आमच्या दोघांची परत गाठ न पडेल तरच बरं ! कारण भेटायचं तर माझं तोंड असणार पश्चिमेला अन् अन्वरचं तोंड असणार पूर्वेला ! तर काय कारायचंय् असं भेटून ? ह्या दुनियेत काही आम्हाला हात मिळवायची सोयच नाही !

पण तसंही झालं नाही ! अन्वर वेडाच ना ! अगदी ठार वेडा ! जसा धाडसी, तसाच रांगडा.

माझ्या युनिटला पाठवून देऊन मी छावणी हलवायच्या बेतात आहे, इतक्यात जीवनसिंग घाईघाईनं आला.

म्हणाला--सर ! पाकिस्तान बॉर्डर--कडनं एक जीप इकडं येतेय् !

लगोलग मी तंबूच्या बाहेर आलो. डोळ्याला दुर्बीण लावली.

खरंच की ! जीपच्या दोन्ही बाजूंना दोन निशाणं लावलेली. एक पाकिस्तानी राष्ट्रध्वज न् दुसरं साधं पांढरं निशाण !

जीवनसिंग काही माझ्या हुकमाची वाट बघत थांबला नव्हता ! उरल्या-सुरल्या लोकांना त्यानं लष्करी नियमाप्रमाणं हुकूम देऊन टाकला होता. सगळे अॅटेन्शनमधे आले ! त्यांनी बंदुका रोखल्या ! हुकूम मिळाला की फायर करणार !

जीप सरळ येऊन माझ्या तंबूसमोरच थांबली. गाडीत एकचजण होता. ड्रायव्हर स्वत: ! पाकिस्तानी सेनापती ब्रिगेडियर अन्वर हुसेन ! बरोबर कुणी बॉडीगार्डदेखील नव्हता ! बरोबर होतं फक्त कमरपट्ट्यांतलं रिवॉल्वर. अन्वर हुसेन पहिल्यापास्नंच असा बेपर्वा होता !

दोन रांगा करून रायफली रोखून असलेल्या सैनिकांच्याकडे त्यानं एकदा नजर टाकली. मग तो माझ्याकडे वळला. अन् हंसला !

सैनिकांना स्टॅंड-ईझी करून मी

अन्वरला म्हणालो--ये ! आत ये !

आम्ही दोघंही आत आलो. आतल्या खुर्च्यांदेखील पॅक झाल्या होत्या.

--कोई बात नही ! बैठो उसी पर !

एका पेटाऱ्याकडे बोट दाखवून मला बसायला सांगत तो स्वत:पण बसला.

मी म्हणालो--काय झालं ? आपली परत भेट व्हायला नको म्हणून अल्लाकडे मी प्रार्थना करतो असं तू कालच तर म्हणत होतास ना ?

अन्वरनं एक चिरूट शिलगावला. ही ! चिपटलेलं सिगरेटचं पाकीट काढलं नाही. हिप-पॉकेटमधनं ! सुंदर कातडी केसमधनं भारी हवाना सिगार बाहेर काढला. 'कटर'नं सहजपणानं त्याचं टोक उडवलन्.

हसून म्हणाला--तुला अजूनदेखील हे चालत नसेलच, ना ?

--हो ! धन्यवाद ! पण माझ्या प्रश्नाचं काहीच उत्तर दिलं नाहीस तू !

तोंडभर धूर धरून अन्वर म्हणाला --तुझा गैरसमज झालाय् दोस्त ! काल मी काही असं नव्हतो म्हणालो ! तुझीमाझी परत गाठ पडली तर तुझं तोंड असणार पश्चिमेकडे न् माझं असणार पूर्वेकडे--असं मी म्हणालो होतो ! अन् माझी त्यालाच हरकत होती. पण आज तर नेमकी ह्याच्या उलटी परिस्थिती आहे. आज आपण दोघंही आपापल्या देशात परत जातोय् ! तुझं तोंड आज आहे उगवतीला ! अन् माझं आहे मक्केला !

ह्या हवाना सिगारच्या धुरानं अन्वर काय फिलॉसॉफर वगैरे झाला का काय?

मी म्हणालो--तुझ्या पत्रात तू ज्या काही गोष्टी काढल्यायत--

--खामोश ! त्या गोष्टी राहू देत हरगोविंदभाई ! त्या गोष्टींची चर्चा करायला काही मी आलेलो नाही !

--मग कशाची चर्चा करायला आलायस तू ? आजच्या हवेची ?

--नाही ! त्याचीही नाही ! काय आहे दोस्त, काल रात्रभर मला काही झोप आली नाही ! राहूनराहून वाटत होतं, असं कसं असेल ? असं असणं शक्यच नाही ! अर्थात् आपण दोघंही चुकतोय् ! कुठतरी काहीतरी चूक होतेय् आपल्या दोघांच्याही हातनं ! ह्या पिंजऱ्यातनं बाहेर पडायची काही-नाकाही वाट नक्कीच आहे ! फक्त ती नजरेला पडत नाहीय् तुझ्यामाझ्या !

--कशातनं बाहेर पडायची वाट ? हे कशाबद्दल बोलतोयस तू ?

माझं बोलणं अन्वरच्या कानावर गेलंच नाही बहुतेक.

तो तसाच बोलत राहिला--तुला आज 'चलो दिल्ली' म्हणता येत नाहीय् ! मलापण तुझ्याबरोबर 'जयहिंद' म्हणता येत नाहीय् ! पण हाच शेवटचा शब्द कसा असू शकेल ? ते शक्यच नाही ! ह्या पेचाची काहीतरी सोडवणूक नक्कीच आहे ! तू भारतीय आहेस अन् मी पाकिस्तानी आहे--पण आपण दोघंही माणसंच आहोत की ! There must be a common platform–a meeting ground ! जग एवढं मोठ्ठं आहे, त्यात अशी एखादी

छोटीशी जागा नाही की जिथं आपल्या दोघांना मित्र म्हणून हात मिळवता येतील ?

--मला तर काही अशी जागा दिसत नाही अन्वर !

--पण मला दिसतेय् दोस्त ! म्हणूनच तर एवढा सकाळीसकाळी धावतपळत आलो एकटाच !

--कोणती जागा ?

--'जयहिंद' न् 'चलो दिल्ली' सोडून आणखीही एक फौजी पुकार आपण देत होतो आवाज मिळवून ! ह्या घोषणेत काही राष्ट्र नाही, धर्मांधता नाही, हिंदुस्थान नाही, पाकिस्तान नाही! त्या घोषणेत आहे फक्त जयगान! खुदातालानं बनवलेल्या श्रेष्ठ माणसाचं जयगान ! माणुसकीचं मूर्तं प्रतीक असलेल्या आपल्या महान् नेत्याचा जयजयकार! इन्सानियतचा जयजयकार! हा मंत्र उच्चारायला आपल्या कुणालाच काही अडचण नाही ! चल दोस्त ! ह्या निरोप घ्यायच्या क्षणी आपण शेवटची म्हणून ही घोषणा देऊ या ! --नेताजी झिंदाबाद !

वाहव्वा अन्वर ! वा रे मेरे दोस्त ! कुठल्याच परिस्थितीत तू निराश होत नाहीस ! नेताजींचा शिष्यच तू ! आजन्म आशावादी ! अशा आशावाद्याला अडकवून ठेवायची ताकद कोणत्या तुरुंगात असते ! ह्या बेकार जातीयतेच्या बंदीशिबिरातनं बेड्या तोडून हा प्रौढ सैनिक बरोब्बर बाहेर पडलाच !

आम्ही दोघंही उभे राह्यलो. एकमेकांना कडकडून मिठी मारली. अन् आसवांनी दाटून आलेल्या आवाजात म्हणालो--नेताजी झिंदाबाद !

सगळ्याच्या वर माणूस खरा ! त्याच्या वर काहीच नाही !

त्या माणुसकीचं सर्वश्रेष्ठ प्रतीक म्हंजे आमचे नेताजी !

हे नेताजी हिंदू नाहीत, शीख नाहीत, मुसलमान नाहीत ! ते आहेत महामानव ! हिंदुस्थान-पाकिस्तानच्याही वरतो त्यांची जागा ! त्या नेताजींचा जयजयकार असो ! माणसाचा जयजयकार असो !

आमच्या दोघांचेही डोळे भरून आले !

अन्वर म्हणाला--तुला एक भेट द्यायचीय् मला ! हे एवढं राहू दे तुझ्याकडे !

खिशातनं त्यानं एक भारी वॅलेट काढलं. त्याच्या एका कप्प्यातनं काळजीपूर्वक एक फोटो ओढून काढला. ग्रुप फोटो ! अन्वरच्या कुटुंबांतल्या मंडळींचा ! मला एकेकाची ओळख करून दिली.

--ही माझी बायको ! हा थोरला मुलगा रहीम ! ही मुलगी रबेया ! अन् हा धाकटा मुलगा रहमत ! अन् ही नात--मुलीची मुलगी --मुन्नी !

त्या प्रौढ सैनिकानं आपला कौटुंबिक फोटो मला दिला !

मी म्हणालो-- हा फोटो तू मला देतोयस, पण तुझ्या पाकिटाचा एक कप्पा रिकामा झाला की रे !

--म्हणून काय झालं ? मी तर

आता घरच्या लोकांतच जातोय् की !

——नाही, तसं नव्हतं म्हणायचं मला. तुझ्या पाकिटाचा हा कप्पा भरायचं माझ्यावर लागलं !

अन् मी माझ्या पाकिटातनं एक फोटो काढला. गेली वीस वर्षं हा फोटो कायम माझ्या छातीवरच्या खिशात असायचा.

अन्वर म्हणाला—— तुझ्या पाकिटात पण फोटो ? कुणाचा ? तू तर काही घरदार थाटलंच नाहीस अन्——

एव्हांना मी फोटो काढून त्याच्या हातात दिला होता.

फोटो हातात घेऊन अन्वर बराचवेळ गप्प बसून राहला.

मग म्हणाला——चुकलोच मी ! खरं म्हंजे लक्षात यायला हवं होतं माझ्या ! त्यांच्याशिवाय आणखी कुणाचा फोटो असणार तुझ्या पाकिटात !

माझी लांबलचक कहाणी संपली आता. ही माझी प्रत्यक्ष जबानी ! स्वतःच्या डोळ्यांनी पाह्यलेल्या गोष्टी !

अन्वरची काही नंतर गाठ पडली नाही परत. तो पण रिटायर झाला असं कानावर आलं होतं.

परवा——काही वर्षांपूर्वी——अचानक एक पत्र आलं होतं त्याचं. लिहिलं होत ——दोस्त ! काही गैरसमज करून घेऊ नकोस ! कोणताच आरोप करायचा नाही मला. फक्त कुतूहल आहे. अन् त्याला आवर घालता येत नाहीय् मला. हिंदुस्तान स्टँडर्डमधे खासदार डॉक्टर सत्यनारायण सिंह ह्यांचे अलीकडे काही लेख आले होते, ते वाचलेय्स का तू ? मला कुतूहल आहे ते काही फक्त ह्या लेखात जं आलंय् त्याच्या खरेखोटेपणा-बद्दलचं नाही; पण स्वतंत्र भारताच्या सरकारवर त्यांनी जो हिमालयाएवढा आरोप केलाय्, त्याच्याबद्दल तुम्ही लोक एवढ गप्प गप्प का ? तुमच्या देशात तर काही लष्करी हुकुमशाही नाही ! डॉक्टर सिंहांचा आरोप खरा असेल तर मग आज हिंदुस्तान इतका उदासीन, निर्विकार का ? अन् त्यांनी केलेला आरोप खोटा असेल तर मग ह्या लेखकावर राष्ट्रद्रोहाच्या आरोपाखाली सरकार खटला का म्हणून भरत नाहीय् ?

रांगड्या अन्वरनं विचारलेल्या आधीच्या सहा प्रश्नांच्यासारखंच ह्या सातव्या प्रश्नाचं उत्तरपण मला तरी काही ठाऊक नाही !

तुम्हाला ठाऊक आहे ?

# स मा प्त

म. ए. सोसायटीचे

# महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

जून १९७३ पासून कॉलेजला मराठवाडा विद्यापीठाकडून खालील पदव्युत्तर वर्ग सुरू करण्याची अनुमति मिळाली आहे.

**एम्. ए. इंग्रजी**
**एम्. ए. मराठी**
**डिप्लोमा इन बिझिनेस मॅनेजमेंट**

या वर्गांना शिकविण्यासाठी ज्येष्ठ प्राध्यापकांची नेमणूक करावयाची आहे.

पदव्युत्तर वर्ग शिकविण्याचा तीन वर्षांचा अनुभव आणि डॉक्टरेट असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. यांपैकी एक पात्रता असणाऱ्या उमेदवारांचाही यथासंभव विचार केला जाईल.

वेतनश्रेणी ४०० ते ८०० आणि ७०० ते ११००. पात्रता व वेतनश्रेणी मराठवाडा विद्यापीठाच्या नियमानुसार. अधिक पात्र उमेदवारांना वरील श्रेणीमध्ये वेतनवाढही मिळू शकेल.

५ एप्रिल १९७३ पर्यंत अर्ज करावेत.

उदगीर हे तालुक्याचे गाव (३५,०००) असून लातूरपासून ५० मैलांवर आहे. कॉलेजमधे एकूण २४०० विद्यार्थी व ६० प्राध्यापक आहेत. बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या स्थानिक संस्थेकडून कॉलेज चालविले जाते. संस्थेची आर्थिक स्थिती समाधानकारक आहे.

अर्ज करण्यापूर्वी वा नंतर उदगीरला येऊन गाव व संस्था पाहून घेणे उमेदवारांच्या दृष्टीने इष्ट ठरेल.

**संग्रामप्पा कप्पिकेरी,** अॅडव्होकेट
सेक्रेटरी

**डॉ. ना. य. डोळे**
प्राचार्य

## पुस्तके

चटकदार अनुवाद

# नरभक्षकांच्या जबड्यात

वा. भा. जोशी

...आम्ही सर्व मैत्रिणी नाटयगृहात जाऊन बसतो ... इतक्यात मखमली पडदा वर गेला...एक गाणं झालं...आणि नाटयगृहाच्या चालकांनी पॅसिफिक महासागरात पर्यटन केलेल्या त्या तरुण प्रवाशाची ओळख करून दिली. त्याचे नाव होते मार्टिन जॉन्सन. त्या तरुणाने आपला जीव धोक्यात घालून रानटी लोकांच्या बेटात जाऊन चलत्‌चित्रपट घेतला होता, तो त्याने पडद्यावर दाखवायला सुरुवात केली.


...मला या साऱ्या कार्यक्रमाचा अतिशय कंटाळा आला. पडद्यावर दाखविली जाणारी ती रानटी माणसे अतिशय भेसूर आणि क्रूर होती. त्यांचे गलिच्छ, ओंगळ आणि भयानक चेहेरे पडद्यावर पाहताना माझ्या अंगावर काटा उभा राहिला आणि भीतीने माझे सारे अंग शहारते!...मला त्यावेळी आइस्क्रिम खाण्याची लहर आली. माझ्याबरोबर आलेल्या शाळेतल्या मैत्रिणीसुद्धा कंटाळल्या होत्या. मी सर्व-जणींना ऐकू जाईल अशी एक सांकेतिक शिट्टी मारली...आणि आम्ही सर्व मुली नाटयगृहाच्या बाहेर पडलो.

### त्या साहसाशीच लग्न !

ओसा जॉन्सन या अमेरिकन महिलेच्या आत्मचरित्रातील अगदी प्रारंभीचा हा किस्सा. पण नियती अशी वस्ताद की नाच-गाण्यास बुजणाऱ्या ह्या तरुणीची गाठ पुढे खुद्द मॉर्टिनशीच पडली. आणि ओसा जॉन्सनचे जीवनच बदलून गेले.

मार्टिन जॉन्सनला जंगली जीवन जास्तीत जास्त नैसर्गिक स्वरूपात चित्रित करण्याचा छंद होता. हे चित्रण चित्रपटाच्या स्वरूपात तो दाखवित असे. नरभक्षक मानव, त्यांचे दैनंदिन जीवन विविध हिंस्त्र श्वापदांची दिनचर्या आदींचे अगदी जवळून चित्रण करून मार्टिनने साऱ्या जगालाच थरारून सोडले यात शंका नाही. आणि त्याच्या ह्या साहसात सहधर्मचारिणी बनून ओसाने जी साथ दिली तीही तितकीच थक्क करणारी आहे, यातही शंका नाही.

१९१० ते १९३७ हा सत्तावीस वर्षांचा काळ ओसाने आपल्या पतीच्या समवेत जगप्रवास करून अनेक साहसांशी झुंज देण्यात घालविला.



सारेच काही चित्तथरारक, विलक्षण ..

### मानवी मुंडक्यांचे ढीग

नरभक्षक जमातीचे म्हणून प्रसिद्ध असलेल्या मालेक्युला बेटावर ओसाने जे पाहिले आणि मार्टिनने आपल्या कॅमेऱ्याने जे जे टिपले ते सर्वच काही चित्तथरारक आणि विलक्षण होय !

टोपल्यात आक्रोड भरून ठेवावे तशी माणसांची वाळलेली मुंडकी टोपल्यात भरून ठेवण्याची त्या रानटी लोकांची पद्धत असे. आणि त्या 'शिर-गृहास' ते पवित्र समजत !...वीस डुकरांची किंमत देऊन विकत घतलेली बायको घरातून पळून जायची. तशी ती पळून जाऊ नये म्हणून त्या मुलीचे पाय गुडघ्यात मागील बाजूस दुमडून त्यात भट्टीत घालून गरम केलेला दगड बांधायची ती शिक्षा पाहून तर ओसा बेशुद्धच झाली.

अशा प्रकारचे टॉमन, बोर्निओ, लेक पॅरडाइज आदी विविध बेटांवरील मानवीप्राण्यांचे आणि सिंह, वाघ, हत्ती, सुसरी आदी जंगली–प्राण्यांचे अगदी त्यांच्यात वावरून ह्या साहसी जोडप्याने अनेक भयानक अनुभव घेतले. चित्रितही केले.

आणि त्या साहसी जीवनाचेच शब्दांकन ओसा जॉन्सन हिने आपल्या 'आय् मॅरिड अॅडव्हेन्चर' ह्या आत्मचरित्रात केले आहे. १९३७ च्या एका विमान अपघातात मार्टिनचे निधन झाले. मग १९३९ ते ४६ पर्यंत ओसाने क्लार्क गेट्सशी विवाह करून नवे जीवन जगण्याचा प्रयत्न केला. पण १९४९ साली तिने घटस्फोट घेतला. कारण तिच्याच शब्दांत सांगायचे तर, खांद्यावर बंदूक टाकून जंगलातील साहसांना सामोरे जायला तिचे मन नेहमी उत्सुक असे'

वयाच्या ५८ व्या वर्षीही अफ्रिकेच्या जंगलाची सफर करणाऱ्या ओसा जॉन्सनचे चरित्र काल्पनिक कादंबरीपेक्षाही चटकदार आहे. आणि मराठीत यथातथ्य अनुवाद करून रंगा मराठे यांनी तो चटकदारपणा जराही कमी होऊ दिलेला नाही, हे विशेष होय. ◻

**नरभक्षकांच्या जबड्यात!**
लेखक – ओसा जॉन्सन.
अनुवादक – रंगा मराठे.
किर्लोस्कर प्रकाशन.
पृ. २+१०८
कि. रु. ५/–


# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखक : अरुण साधू

किंमत : चवदा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

## ' बॉम्बे '

पृष्ठ १६ वरून

त्यांच्या कक्षा रुंदावल्या होत्या. मराठीची अडचण होती पण त्यांच्या मूळ साहित्यप्रेमामुळे त्यांनी भराभर मराठी पुस्तके वाचून आपला व्यासंग वाढविला. त्यांच्या निर्व्याज हंसतमुख चेहऱ्याने आणि मनमोकळेपणाने ते सर्वांशी सहजतेने मित्रत्वाचे नाते जोडू शकले. त्यासाठी त्यांना डेल कार्नेजी वाचण्याची आवश्यकता नव्हती.

मराठी साहित्य-विश्वात अपरिचित परंतु इंग्लिश पुस्तके विकणाऱ्यांना नित्य परिचयाच्या अशा अनेक गोष्टी कुमठांनी 'पॉप्युलर'मध्ये पाहिल्या होत्या. आता 'बॉम्बे'मधे अधून मधून कधी त्यांना उसंत मिळाली की ते लगेच अस्वस्थ होत आणि काहीतरी नवीन उद्योग शोधायला लागत. यांपैकी पहिला उपक्रम वार्षिक सूची तयार करण्याचा. दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या मराठी पुस्तकांची विषयवार सूची छापून वाचनालयांना पाठविण्याचे काम 'बॉम्बे'ने सतत तेवीस वर्ष केले आहे. अशी परिपूर्ण यादी तयार करणे हे किती कठीण आणि किचकट काम आहे याची कल्पना निदान ग्रंथपालांना असावी. आजवर अनेक संस्थांनी आणि पुस्तकविक्रेत्यांनी हे काम हातात घेऊन सोडलेले आहे. पण कुमठांचा विशेष असा की, आपण काही मोठे काम करीत आहोत असा आविर्भाव त्यांचा नसतोच. भाव खाणे किंवा भाव वाढवून घेणे ह्या दोन्ही गोष्टी त्यांना कधीच जमलेल्या नाहीत. मग इतरांनाही वाटू लागते की कुमठा करतात ही एक सर्वसाधारणच बाब आहे. आणि वाचनालयेही ह्या प्रचंड कामाकडे दुर्लक्ष करून कमिशनवर डोळा ठेवून पुस्तके खरेदी करतात.

तीनएक वर्षांत बॉम्बे बुक डेपोचा 'मराठी पुस्तकांचे माहेरघर' म्हणून जम बसला. मराठीत एखादे पुस्तक प्रसिद्ध होऊन ते बॉम्बे बुक डेपोत आले नाही असे कधी व्हायचे नाही. त्याचप्रमाणे मुंबईतील साहित्यप्रेमी आणि साहित्यिक मंडळीही दुकानात अधूनमधून डोकवायचीच. यातून हळूहळू मराठी प्रकाशनाचा मोह होणे क्रमप्राप्तच होते. ही १९५२ ची गोष्ट. मी त्यावेळी कॉलेजच्या दुसऱ्या वर्षात होतो आणि हळूहळू 'मौज' ग्रुपमधे पाऊल टेकवायला लागलो होतो. बॉम्बे बुक डेपोने गंगाधर गाडगीळ यांच्या दोन

पुरंदरच्या
बुरुजावरून
ब. मो. पुरंदरे
मूल्य : चार रुपये
राजहंस प्रकाशन

कथासंग्रहांसाठी करारपत्र केले होते. मी माझ्या सवयीनुसार संध्याकाळी दुकानात फेरी मारायचो. मी लगेच प्रकाशनांचा ताबा घेतला. पॉप्युलर प्रकाशनचा ह्या वेळपासूनचा इतिहास हा एक स्वतंत्र विषय आहे. परंतु प्रकाशनसंस्थेचा जन्म, वाढ आणि जोपासना ही बॉम्बे बुक डेपोच्या छत्राखालीच झाली हा महत्वाचा मुद्दा.

बॉम्बे बुक डेपोचा गेल्या वीस वर्षांतील इतिहास हा सर्वांच्या परिचयाचाच आहे. आज मराठी पुस्तकांसाठी मुंबईतील एकमेव आणि महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट शोकेस बॉम्बे बुक डेपोचीच आहे. ह्या शोकेसमधे आपली पुस्तके दिसावीत म्हणून लेखक प्रकाशक उत्सुक असतात. मराठी पुस्तके लोकप्रिय करण्यासाठी जी धडपड होत असते त्यात बॉम्बे बुक डेपो नेहमीच अग्रभागी असतो. 'बाल साहित्यजत्रा' (उन्हाळ्याच्या सुट्टीत चिल्ड्रन्स बुक फेअर), 'साहित्य–दिंडी' (चातुर्मासात धार्मिक पुस्तकांचे प्रदर्शन) आणि 'पुस्तक पंढरी' (नवरात्रात स्वाक्षरी सप्ताह) ह्या कुमठांच्या खास स्वतःच्या कल्पना आज सर्वांच्या कौतुकाचा विषय झालेल्या आहेत. शिवाय प्रकाशक आणि विक्रेतेही महत्त्वाच्या प्रसंगी बांबेचाच उपयोग करतात. मॅजेस्टिकचे 'ज्ञानेश्वरी' किंवा परचुऱ्यांचे 'सुलोचना' प्रसिद्ध झाली तेव्हा स्वाक्षरीचा कार्यक्रम 'बॉम्बे'तच झाला. पाचसात वर्षांपूर्वी मराठीतील सहा प्रकाशक एकत्र येऊन त्यांनी 'ग्रंथप्रसार केंद्र' ही संस्था काढली. ह्या संस्थेतर्फे श्री. अरुण गाडगीळ (आता कोल्हापूरच्या 'गुलमोहर'चे) यांनी महाराष्ट्रात आणि बृहन्महाराष्ट्रात मिळून शंभर प्रदर्शने भरविली. ह्या केंद्राचे संचालन कुमठांकडेच होते. सर्वांना सांभाळून घ्यायचे, सगळ्यांचा आब राखायचा आणि स्वतः काम करुन श्रेय मात्र घ्यायचे नाही ह्या स्वभावामुळे अशा सार्वजनिक कामात कुमठा आपोआपच गोवले जातात.

आज कुमठा पन्नाशीचे पुढे झुकले आहेत. व्यवसाय आणि संसार ह्या दोन्ही क्षेत्रात त्यांची पंचविसाहून अधिक वर्षे उलटली आहेत. वयोमानाने त्यांच्या डोकीवर चंद्राकार झालेला आहे आणि किरकोळ दुखणीखुपणी सुरू झाली आहेत. पण त्यांचा नुसता उत्साहच नव्हे तर बालसदृश निष्पाप वृत्तीही कायम आहे. सर्वांच्याच चांगुलपणावर त्यांचा विश्वास असल्याने त्यांना कोणाचंही म्हणणं चटकन पटतं. त्यामुळं त्यांना व्यवसायात शत्रू नाहीत तसेच घरीही. साहचर्य आणि व्यवसाय यामुळे ते भटकळ कुटुंबियांत एकरूप झालेले. आमच्या ह्या मोठ्या परिवारात लहानमोठी सर्वचजण निश्चितपणे आणि मोकळेपणाने बोलू शकतात कुमठांशीच. त्यांची चार मुलं –कांचन, भारती, राधिका आणि आनंद त्यांना मित्रत्वाने वागवतात. आणि कुमठाही ज्या आदबीने माझ्या आईशी वागतात त्याच आदबीने आपला नातू राहुल (वय ८ महिने) याला खेळवतात. ●

२५

कुमठाशेठ कधी रागावत नाहीत हे खरं. पण जर का ते रागावले–दहा वर्षांतून एकदा का होईना–तर फारच रागावतात. मी आता आमच्या ओळखीला दहा वर्षं होण्याची वाट पाहतो आहे.


किशोर आरस

कुमठा हे कुमठा आहेत हे माहीत नव्हत तेव्हापासून मी त्यांना अधून मधून बॉम्बे बुक डेपोत पाहत आलो आहे – जवळ जवळ गेली पंचवीस वर्षं. कधी गल्ल्यावर गंभीरपणे बसलेले, कधी काऊंटरवर गिऱ्हाईकांची विचारपूस करणारे तर कधी एका कोपऱ्यात सम-व्यवसायिक किंवा विशेष ओळखीच्या लोकांबरोबर कुजबुजत उभे असलेले. पहाणाऱ्याला असं वाटावं की हा मनुष्य सतत त्याच्या गोंडस चेहऱ्याला न शोभणारा कसला तरी भयानक कट शिजविण्यात गुंतलेला असावा.

बॉम्बे बुक डेपोचा पॉप्युलर बुक डेपोच्या भटकळांशी सबंध आहे हे मला जरूर ठाऊक होतं पण मागील काही वर्षांत कुमठांशी घनिष्ट परिचय होई-पर्यंत ते तिथले जुने प्रामाणिक आणि विश्वासू नोकर आहेत असंच मला वाटत होतं. अर्थात कुमठांचे सासरे, पॉप्युलरचे कै. ग. रा. भटकळ यांच्या-विषयी पॉप्युलर बुक डेपोच्या संदर्भात लोकांची अशीच समजूत होती. निगर्वी आणि कामसू वृत्तीमुळे जावई-सासरा यांच्यातल्या साम्याचं इतकं ठळक उदा-हरण अगदी विरळाच.

ते बॉम्बे बुक डेपोचे प्रमुख सूत्रधार आहेत हा केवढा आश्चर्याचा पहिला धक्का. नंतर अनेक धक्के बसले एकदा कुणीतरी सांगितलं की पांडुरंगशेठ एम्. ए. आहेत. मराठी पुस्तकांना वाहून घेतलेल्या या गृहस्थाचं शिक्षण फक्त कानडीतून (आणि नंतर अर्थात इंग्रजी-तून) झालेलं ही एक बातमीच म्हणावी लागेल परवाच काहीतरी घडलं आणि कुणाकडून अचानक कळलं की ते मुंबईच्या पुस्तक व्यावसायाच्या संघट-नेचे कित्येक वर्षं पदाधिकारी आहेत. आमच्या आयुष्यात काही घडणार असलं (अगर नसलं) तरी लोकांना ते सहा सहा महिने अगोदर कळतं या पार्श्वभूमीवर कुमठांचा स्वत:विषयी काहीच न बोलण्याचा स्वभाव म्हणजे कमालच.

अर्थात कुमठा मुळात बोलतातच फार.थोडे. बोलण्याचं काम त्यांनी त्यांचे



पुस्तकपंढरी, साहित्यजत्रा आणि बरंच काही

दोन मेहुणे सदानंद व रामदास भटकळ यांच्यावर सोपविलं असावं. थोडं बोल तात ते सुद्धा इतकं हळू बोलतात की ते माझ्याशी बोलतात हे कळायलाच सुरुवातीला मला बराच वेळ लागायचा. माझं एक कुतूहल आहे की, भडकल्यानंतर कुमठा काय करीत असतील? त्यांच्या दुकानातल्या एकाने मला सांगितलं, 'ते कधीच रागावत नाहीत हे खरं पण जर का ते रागावले – दहा वर्षांतून एकदा का होईना – तर फारच रागावतात.' मी आता आमच्या ओळखीला दहा वर्षे होण्याची वाट पहातो आहे.

असं असलं तरी मनातल्या मनात कुमठांना कधी कधी राग येत असावा, फक्त तो व्यक्त होत नाही एवढंच. फारच राग आला तर ते तक्रारीच्या सुरात थोडी नाराजी व्यक्त करतात. उदाहरणार्थ, त्यांना अतिशय गरम चहा आवडतो. (त्यांना चहाला बोलावणाऱ्या लोकांनी कृपया नोंद घ्यावी) आणि काही लोक त्यांना आईस्क्रीमसारखा चहा देतात. तेव्हा ते तोंड उघडतात ते फक्त चहा आत टाकण्यापुरतं. अशाच एका घोर प्रसंगी मी त्यांच्या शेजारी बसलो होतो तेव्हा ते माझ्या कानात फक्त पुटपुटले, 'चहा

फारच थंड होता हो ! हे तर काहीच नाही, एकजण त्यांच्या बुकडेपोचो प्रचंड रक्कम काही वर्षं देणं आहे पण अद्याप कुमठांनी त्याच्याकडं एकदाही तोंड उघडलेलं नाही.

भिडस्तपणाची तीच तऱ्हा. 'बॉम्बे बुक डेपोत जत्रा पंढरी वगैरे महोत्सव चालू असतात तेव्हा आंगतुक मंडळी इकडतिकडे लुडबुडत असतात पण तेव्हा कुमठा मात्र आत कुठंतरी चहा-पाण्याची तयारी वगैरे उपयुक्त गोष्टीत गर्क असतात. मध्यंतरी त्यांच्याकडे एका ७०-८० रुपयांच्या महागड्या पुस्तकाच्या दोनशेपैकी शंभर प्रती पडून आहेत असं कळलं. मी म्हटलं, 'अरे पण तुम्हा दोनशे प्रती घेतल्याच कशाला ?' ते म्हणाले, 'मी कुठं घतल्या, त्या प्रकाशकानेच पाठवून दिल्या. तो म्हणाला, कुमठा, तुम्ही कमीत कमी इतक्या घेतल्याच पाहिजेत.' माझी खात्री आहे की केवळ कुमठा घेतील म्हणून बऱ्याच मंडळींनी मराठी पुस्तक प्रकाशनाचं पहिल काम अंगावर घेतलं असावं. असाच मी एकदा बसलो असताना सहज कुठचं पुस्तक खपतं आहे म्हणून चौकशी केली. ते म्हणाले, मॅजेस्टिकचं 'अनंगरंग रतिशास्त्र.' मी ते मागितल. त्यानंतर बहुतेक कुमठा घाबरले असावेत कारण ते आत हलक्या पावलांनी गेले आणि कागदात गुंडाळून आणलेले ते पुस्तक माझ्या हातात गुपचूप खुपसलं. बाळंतपण करणाऱ्या डॉक्टरनी बायकांना घाबरावं तसाच हा प्रकार.

काही वेळा माझ्या मनात एक गमतीचा विचार येतो. बॉम्बे बुक डेपोत जाणाऱ्या, कुमठांना ओळखणाऱ्या, एका माणसाच्या गिरगावात चालता चालता सहज मनात येतं आणि बॉम्बे बुक डेपोच्या पायऱ्या चढून तो कुमठांना दरडावतो, 'बस झालं. तुम्ही इथे पंचवीस वर्षं काढलीत. आता तुमच्या जागेवर मी बसतो. तुम्ही बाहेर पडा कसे !' ते ऐकल्यावर कुमठा चटकन दुकानाच्या पायऱ्या उतरतात आणि चालायला लागतात. ते क्षणभरही मागे वळून पाहत नाहीत.

मला समजलेले कुमठा शेठ असे आहेत. प्रखर मर्यादा असलेले. हे समजत नाही की या मर्यादांच्या चौकटीत बॉम्बे बुक डेपोला ते आजचं स्वरूप कसं बरं देऊ शकले. आज बॉम्बे बुक डेपो हा मराठी पुस्तकांच्या विक्रीत अग्रभागी आहे. निव्वळ धंदेवाईक दृष्टी न बाळगता सचोटीने व दीर्घकाळ टिकणारे संकेत पाळून या पुस्तकालयाची वाढ झालेली आहे. ह्या संस्थेला आज महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनात एक महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे बालसाहित्य जत्रा, साहित्य दिंडी, पुस्तक पंढरी इत्यादी अनेक उपक्रम त्यांनी यशस्वी करून दाखविले आहेत. इतके नवीन व विविध उपक्रम त्यांनी कसे काय सुरू केले मान्यता पावलेल्या अनेकांचा इतका लोभ कसा काय जोडला ? पण थोडा सूक्ष्म विचार केला तर ध्यानात येतं की या 'मर्यादा' हीच अखेर. कुमठांची सारी शक्ती आहे. मर्यादांनी कुमठांना एक आगळाच कणखरपणा दिलेला आहे.

● ● ●



# शंकर घाणेकर

## एक शैलीदार नट....
## एक नमुनेदार माणूस....

वि. भा. देशपांडे

शंकर घाणेकर......!

तुम्ही गेलात. अजूनही ते खरं वाटत नाही. तुमच्या निधनाची बातमी ऐकली आणि वाटलं, की तुम्हीच तुमच्या मृत्यूचा विनोद लोकांना सांगितलात ! पण तसं नव्हतं ! तुम्ही गेलात, ही आता वस्तुस्थिती आहे. तो इतिहास आहे ! घाणेकर, तुम्ही विनोदी भूमिकांच्या दर्शनानं रंगभूमीवर उदंड कीर्ती मिळवलीत. लोकांनी तुमच्यावर अपार

प्रेम केलं. त्या प्रेमाचा शोध घेताना तुमच्या नाट्यगुणांचा विचार मनात सहजतेनं येतो. त्यामध्ये नकारात्मक अनेक गोष्टी आहेत. विनोदी नटाला अनुकूल अशी तुम्हाला चेहरेपट्टी नव्हती, खास अशी शरीरउंची नव्हती. उत्तम आवाजाची देणगी नव्हती. होता तो आवाज जाडाभरडा, खरखरीत होता. एकाच पद्धतीचा होता. तरीही तुम्ही रंगभूमीवर अपूर्व यश कशाच्या बळावर मिळवलंत? मला वाटतं, नटाला आवश्यक असणाऱ्या गोष्टींच्या उणीवांवर मात करणारी तुमची एक विशिष्ट अभिनय-शैली होती. ती सतेज होती. निखळ होती. मिळालेल्या भूमिकेचा वेध घेण्याची ताकद त्या शैलीत होती. शब्दांवर तुमची विलक्षण हुकमत होती. शब्दफेकीचं एक जाणतं अवधान तुम्हाला होतं. कोणत्याही नाटकात तुम्ही रंगमंचावर येण्यापूर्वी तुमची एक विशिष्ट पद्धती होती, ती म्हणजे तुम्ही विंगमधून मोठ्या आवाजात बोलणं सुरू करीत होतात. तुमचा आवाज आणि शब्द हा तुमच्या अगोदर रंगमचावर येत असे. तो शब्द, आवाज प्रेक्षकांनी ऐकला की ते सुखावत—मोहरून जात आणि म्हणत आता 'मजा येणार'! तुम्ही रंगभूमीवर येणं म्हणजे 'रिलिफ' होता. तो 'रिलिफ' प्रत्येक नाटकातून सामान्य प्रेक्षकांना अपेक्षित असतोच. तो पुरेपूर तुम्ही देत होतात. तुमचं रंगमंचावर असणं हे चैतन्यदायी होतं. तुम्ही नाटककाराचे पाठ केलेले शब्द म्हणणं एवढंच आपलं कृतार्थपण मानीत नव्हतात, तर त्या शब्दांपलीकडच्या अनेक बारीकसारीक गोष्टींना साऱ्या तपशिलानं साकार करीत होतात. तुम्ही रंगमंचावर स्वस्थपणे उभं राहिल्याचं मला तरी आठवत नाही. एकतर तुमच्या हातांची—बोटांची हालचाल तरी चाललेली असायची, नाहीतर मुद्रेवर अनेक भाव तुम्ही प्रकट करीत असायचे! डोळे बारीक करून मिष्कीलपणानं हसणं हा तर तुमचा स्व:भावविशेष रंगभूमीवरही सतत दिसत राहायचा! इतरांचे संवाद चालू असताना त्या नटांना त्रास होणार नाही, याची तुम्ही काळजी घेत होतात. एखाद्‌वेळी एखाद्याची गम्मतही करीत होतात, पण त्यात विषारी स्पर्धा नव्हती. नाट्य परिणामाच्या दृष्टीने हानिकारक काही नव्हतं! पण या तुमच्या बारीकसारीक युक्त्यांपेक्षा आश्चर्य वाटायचं, ते तुमच्या स्वच्छ वाणीबद्दल! जसं रंगमचावर प्रवेशण्यापूर्वीच प्रेक्षकांकडून स्वागताची टाळी मिळण्याचं भाग्य फारच थोड्या नटांना आहे, तसंच उत्तम शब्द प्रेक्षकापर्यंत पोहचून दाद मिळण्याचं भाग्यही थोड्यांनाच आहे. त्या 'थोड्यां'मध्ये तुम्ही एक होतात. तुमची शब्द उच्चारण्याची—फेकण्याची एक विशिष्ट पद्धती होती. नाटकाच्या भाषेत बोलायचं तर तुम्हाला 'टायमिंग सेन्स' होता. शब्दाच्या अचूक फेकीनं तुम्ही सारं सभागार प्रफुल्ल करीत होता. नाटक कितीही कंटाळवाणं असल तरी तुमच्यासाठी ते पहात राहावसं वाटायचं. तुम्ही नाटकातला मराठी शब्द तर स्वच्छ बोलत होतातच, पण

हिन्दी, उर्दू, संस्कृत शब्दांवरही तुमची हुकमत होती. मंदारमाला, पंडिराज जगन्नाथ, कट्यार...ही नाटकं त्याला साक्षी आहेत.

तुम्ही एखाद्या नाटकातली भूमिका चांगली केली, असं म्हणण औपचारिक होईल; कारण ती भूमिका नुसती चांगली होत नसे, तर त्या भूमिकेवर तुमची मुद्रा प्रस्थापित होत असे. भूमिकेवर नटाच्या व्यक्तित्वाची-अभिनयगुणांची मुद्रा प्रस्थापित होणं, ही सामान्य गोष्ट नाही. ती तुम्हाला साधलेली गोष्ट होती. आमचं नाव बाबुराव, दुरितांचे तिमिर जावो, पंडितराज जगन्नाथ, कट्यार काळजात घुसली ह्या नाटकातील भूमिकांवर तुमची मुद्रा दीर्घकालीन आहे. तुमच्यानंतर कदाचित ही नाटकं होतीलही. ती होणं अपरिहार्यही असतं. पण त्यामध्ये काम करणारे कलाकार तुमच्या अनुकरणाच्या पलीकडे जाताना दिसतील का ? ती नाटकं पाहताना क्षणाक्षणाला तुमची याद येत राहणारच. ती याद येणं, दुसऱ्या नटाला ती भूमिका स्वीकारताना अवघड वाटण यातच सारं काही आलं !

घाणेकर, तुम्ही केवळ एक उत्तम नट असतात, तर प्रासंगिक कौतुक होऊन तुमचा आमचा (प्रेक्षकांचा) संबंध तिथेच संपला असता ! तुम्ही जसे एक शैलीदार नट होतात, तसंच एक नमुनेदार माणूस होतात. रंगभूमीवर आणि बाहेर तुमचं दर्शन तितकंच दिलखुलास, मनमोकळं, सर्वस्पर्शी होतं. नट म्हणून खोटी ‘ इमेज ’ तुम्ही निर्माण केली नाहीत. त्या खोट्या नाटकी आवरणात स्वतःला गुंतवून घेतलं नाहीत. आपला पंथ, गट, संस्था निर्माण केली नाहीत. तुम्ही ‘ शंकरराव ’ही झाला नाहीत आणि ‘ शंकरबुवा ’ही झाला नाहीत. तुम्ही आमच्यासारख्या सामान्य प्रेक्षकाशी केव्हाही कुठेही—कितीही वेळ नाटकाविषयी बोलत होतात. तुम्हाला भेटणं हा एक आनंद होता. मजा होती. तुमच्या नाटकाच्या प्रयोगाच्या दिवशी संध्याकाळी थिएटरवर आलं, की तास-दोन तास धमाल उडत असे. पाच-दहा लोकांच्या घोळक्यात हास्याची कारंजी उडवण्याचा तुमचा उद्योग चाललेला असायचा. त्यामध्य अनेक व्यक्तीवर नावं घेऊन, नावं न घेता तुम्ही बेधडक विनोद करीत होता. पण कोणत्याच व्यक्तीबद्दल तुम्हाला मत्सर नव्हता, द्वेष नव्हता. तुमचा विनोद बोचरा असूनही रक्तबंबाळ करणारा नव्हता. निर्वीष होता. त्यामुळं तुम्हाला पुन्हा पुन्हा भेटण्यात आनद होता.

घाणेकर, तुम्ही मराठी रंगभूमीचं एक चालत बोलतं ‘ बुलेटिन ’ होतात. कुठं कुठं, काय काय घडलं ते तुमच्यापर्यंत तपशिलासह येत असे. ते तुम्ही आम्हा सर्वांना जाहीरपणानं सांगत होतात. पण कट्ट्यावर बसून नाटकी मंडळींची टर उडवणं एवढच त्यातून तुम्ही साधत नव्हता, तर तुमची नाट्यविषयक मतंही प्रकट करीत होतात. दोन महिन्यापूर्वी तुमचीमाझी भेट झाली, तेव्हा आपण ‘ सखाराम—

घाशीराम 'वर खूप बोलली, वाद केला. तुमची आमची नाट्यविषयक मतं प्रत्येकवेळी जुळत होती, असं बिलकुल नाही, तुम्ही आम्हाला नवतावादी, प्रगतीवादी असे शब्द वापरून आमचीही भरपूर टिंगल करीत होतात. पण त्यात एक फार चांगली गोष्ट होती, ती म्हणजे तुम्ही परंपरेचे जसे अभिमानी होता, तसेच नव्याचेही चाहते होता. तुम्हाला खाडिलकर-गडकरी-शिरवाडकर जसे आवडत, तसेच खानोलकर–तेंडुलकरही आवडत. त्यांची सर्वच नाटके तुम्हाला आवडत होती असं नाही. पण नाटककार म्हणून त्यांच्याबद्दल तुम्हाला आस्था होती, प्रेम होतं. रंगभूमीच्या संदर्भात तुमची भूमिका शिवत्वाची होती. रंगभूमीवरील आशयाचं, विषयाचं, मांडणीचं शुचित्व मानणाऱ्यांपैकी तुम्ही होतात. तुमच्या पद्धतीनं तुम्ही त्या बाजूचं समर्थनही करीत होतात. रंगभूमीविषयीची अनेक प्रकारची तळमळ, दुःखं तुमच्या बोलण्यातून प्रकट व्हायची! बरीच नाटकं तंत्राच्या आहारी जायला लागली आहेत; नाटकापेक्षा, अभिनयापेक्षा तंत्राचाच बडेजाव अधिक होऊ लागलाय, याचं तुम्हाला दुःख होतं. ते दुःख तुम्ही बंगाली रंगभूमीवरचं 'अंगार' नाटक पाहून व्यक्त केलं होतंत! सिनेमातल्या काही लोकांनी नाटकाचा सिनेमा केला, असं तुम्हाला वाटत होतं. विशेषतः ग्रामीण पद्धतीच्या नाटकांच्या संदर्भात तुमचा हा राग होता. तुमची प्रेक्षकांवर अमाप श्रद्धा होती. तुम्ही त्यांना प्रत्यक्ष मायबाप किंवा अन्नदाते म्हटलं नाहीत तरी प्रेक्षक हेच आपलं सर्वस्व आहे, याची तुम्हाला जाण होती. त्याला घटकाभर रिझवणं हे तुम्ही आपल्या आयुष्याचं श्रेयस मानलं होतं! त्यासाठी वाटेल ते करायची तुमची तयारी होती. गाव बदललं की प्रेक्षक बदलतो, त्या बदलत्या प्रेक्षकांचे अनेक किस्से तुमच्याजवळ होते. पण या प्रेक्षकाला हसवण्यासाठी विनोदी नटाला शब्दाच्या–अभिनयाच्या अनेक कोलांटचा उडचा घ्याव्या लागतात, याची दुःखद जाण तुम्हाला होती. तुम्ही मला एकदा म्हणाला होतात, 'आता या कोलांटचा उडचा घेण्याचा कंटाळा आलाय्. पण करणार काय...!' मराठी नाटकातल्या विनोदांच्या आणि विनोदी भूमिकांच्या मर्यादा तुम्हाला अस्वस्थ करीत! तुम्हाला आता नवं आव्हान पाहिजे होतं. मी तुम्हाला एकदा म्हटलं होतं, की 'तुमच्या ह्या विशिष्ट अभिनयपद्धतीनं कितीकाळ तुम्ही लोकांना हसवणार?' तुम्ही म्हणाला होतात "चाललंय तिथपर्यंत चालवायचं, नाहीतर......" 'नाहीतर काय?'...... "नाहीतर मग रत्नागिरीजवळच्या (पिरंदवणे) गावात जाऊन शेती करायची, भाजी विकायची...आपलं शिक्षण बेताच...आपल्याला नोकरी कोणी देणार नाही......"

घाणेकर, तुम्ही दिलेला हा शेवटचा शब्द का पाळला नाहीत? अजून निवृत्त व्हायला तुम्हाला पंधरा-वीस वर्षे होती. तुम्ही अलीकडं गडकऱ्यांच्या नाटकांवर

व्याख्यानं तयार केली होतीत. तुम्हाला आठवतंय, तुमचं एक व्याख्यान सांगलीच्या कॉलेजमध्ये घडवून आणलं होतं. तुमची लोकप्रियता एवढी आफाट की, वर्ग पुरेना म्हणन मोठा हॉल घेतला. हजार-बाराशे श्रोत्यांना तुम्ही दोन तास विनोदात–हास्यरसात डुंबत ठेवलं होतंत. तुम्ही पुण्यामध्ये 'राज-संन्यास'वर दीर्घ व्याख्यान द्यायचं, अशी आपली एक योजना होती. अशा व्याख्यानांचे पैसे तुम्ही अपंग नटांच्या निधीला साह्य म्हणून देत होतात. अशीच खूप व्याख्यानं करण्याचा बेत तुम्ही जाहीर केला होतात त्याचं काय?

घाणेकर, तुम्ही इच्छामरण मागित-लत. परमेश्वरानं तुम्हाला ते दिलंही. पण खरं सांगा, सत्तेचाळीस हे काय एखाद्या उत्तम गुणी कलाकाराच्या मरणाचं वय आहे? ही त्याच्या मृत्यूची वेळ आहे? तुम्ही गेलात, ते आम्हा कोणालाही न भेटता, न सांगता, चकवा देऊन! तुमची प्रार्थना परमे-श्वराने ऐकली. त्या दिवशी तोंडाचा रंग न काढता तसेच गेलात. का तुमच्या सवयीप्रमाणं शब्द-वेळ पाळण्यासाठी तो अट्टाहास केलात! कदाचित ती वेळ तुम्ही पाळलीही असेल, तिथला प्रयोग तुम्ही रंगवलाही असेल. इन्द्र–नारदाबरोबर विनोदी संवादही केले असतील. पण आम्हा अनेकांना दिलेल्या वेळेच, तारखांच काय? आता प्रत्येक नाटकातील विनोदी भूमिकेच्यावेळी तुमची याद येणार, भरतनाट्य, बाल-गंधर्वावर सध्याकाळी तुम्ही तिथं अस-ल्याचा भास होणार! पण ते मोठ्या आवाजातलं बोलणं, डोळे मिचकावून मिष्किलपणे अंगाला गिरकी देणं, सारं सारं संपलं. ते संपायला नको होतं. अजून तुमच्या हातून खूप घडायचं होतं, आम्हाला पाहायचं होतं. म्हणूनच सारखं वाटतं, की घाणेकर तुम्ही जाण्याची इतकी घाई का केलीत?

● ● ●

मध्यंतर

## चि. त्र्यं. खानोलकर

# 'श्रीरंग प्रेमरंग' आणि इतर नाटके

पुष्पा भावे

यंदाच्या राज्यनाट्यस्पर्धेत खानोलकरांची चार स्वतंत्र नाटके व एक अनुवाद सादर करण्यात आला. (चि. त्र्यं. खानोलकरांच्या 'कालाय तस्मै नमः' या नाटकाला गतवर्षी प्रथम पारितोषिकाचा मान मिळाला होता.) नाटककार या नात्याने खानोलकरांचा ज्यावेळी आपण विचार करतो त्यावेळी त्यांच्या काही नाटकांतील संकल्पनाची पृथगात्मता आणि नाट्यकृतींची विषम वीण यातील विरोध निश्चित खटकतो-- तरीही ज्या नाटककारांच्या अपयशांनाही प्रायोगिक रंगमंचाच्या दृष्टिकोनातून महत्त्व आहे अशांमध्ये खानोलकरांना मानाचे स्थान आहे. खानोलकरांच्या कथाकादंबऱ्यात वा नाटकात माणसाच्या स्वगताला आणि आणि सामाजिक वातावरणातून त्या स्वगताला मिळणाऱ्या प्रतिसादाला वा प्रतिछेदाला फार मूलभूत स्थान आहे. यामुळेच झपाटलेली व्यक्तिमत्त्वे खानोलकरांच्या नाटकात आपल्याला वारंवार भेटतात. पारंपरिक दैवतकल्पना, पारंपरिक रंगभूमीचे संकेत वर्तमानकाळावर आरोपित करण्याचाही यत्न आपल्याला खानोलकरी नाटकातून जाणवतो आणि तरीही हा नाटककार अचानक अत्यंत भडक, भावविवश असेही नाटक उभे करतो. याचा प्रत्यय आपल्याला गतवर्षी 'कालाय तस्मै नमः' हे नाटक पाहताना आला आहे. अनुभवाची व्यामिश्रता कोणत्याही साहित्यकृतीचे, विशेषतः नाट्यकृतीचे एक महत्त्वाचे मूल्य असले तरी एकमेव मूल्य नाही. व्यामिश्र अनुभवातून एक सतोल, ससंध आकृती निर्माण होत नसेल तर तो अनुभव पक्व साहित्यरूप धारण करू शकला नाही असेच म्हणावे लागते. खानोलकरांच्या कथाकादंबऱ्यात व नाटकातही कथानकाच्या कल्पना आगळ्या असतात. एखादे झपाटलेले व्यक्तिमत्त्व असते. परंतु कल्पनारम्य पातळी–fantacy आणि वास्तवाची पातळी यातला तोल यांना साधत नाही. एखाद्या सुंदर कल्पनेत वा काव्यात्म संवादात ते स्वतःच इतके रमतात की संपूर्ण रचनेचे भान त्यांना रहात नाही. त्यांच्या नाट्यकृतींच्या संदर्भात विचार करता असे जाणवते की नाट्यमाध्यमाचे तपशीलात्मक भान

असूनही त्यांना संपूर्ण अनुभव नाट्याभिमुख करता येत नाही. विविध विरोधी सूत्रांच्या एकत्र गुंफणीतून उत्तम नाट्यकृती जन्माला येऊ शकते; परंतु ही गुंफण अत्यंत अवघड असते. पाश्चात्य संगीतात Contrapuntal संगीताची जी कल्पना आहे ती वस्तुत: नाट्यकृतीच्या रचनेला अनुकूल अशी आहे. खानोलकरी नाटकात अनेक लक्षणीय अनुभव रचनेत प्रस्तुत स्थान न लाभल्यामुळे निष्प्रभ होतात. खानोलकरांच्या नाट्यप्रतिभेतील वैगुण्याबद्दल विशेष खंत वाटते. कारण मराठी रंगभूमीवर विविध अनुभव आणण्याचे सामर्थ्य या नाटककारात आहे. इतकेच नाही तर आजच्या मराठी प्रायोगिक रंगभूमीवर दिग्दर्शक नट यांच्या सामर्थ्याला नाटककार पुरे पडत नाहीत याची जाणीवही त्यांना आहे. (पहा: मुंबई मराठी साहित्य संघ वार्ता ऑ. १९७२ अं. १) खानोलकरांनी वाचलेल्या वर उल्लेखिलेल्या टिपणात ते म्हणतात 'भारतीय म्हणून मला जी परंपरा प्राप्त झाली त्या परंपरेत काय प्रेक्षकांना हसवणं आणि रडवणं इतकंच हेच कर्म मी कराव! प्रेक्षकाचा आणि माझा संबंध एवढाच असावा? मी या गोष्टीला नकार द्यायला नको का? परंपरेचा सखोल अनुभव मला ज्या स्वरूपात येईल त्या स्वरूपात मी प्रेक्षकापर्यंत नाट्याच्या माध्यमातून पोचवायला नको का? पण माझी परंपरा आणि आजचा काळ यात प्रचंड दरी आहे आणि आजचा अनुभव हा परंपरेपासून मांसखंडा सारखा तुटून पडलेला आहे आणि या मांसखंडातल्या पेशी-पेशीतून परपराशून्य असा जो अनुभव नाट्यानं चित्तथरारक असा जिवंत आहे तो पेलायला आजचे हे अभिनेते दिग्दर्शक तयार आहेत; पण त्यांना ना साथ त्या प्रत्ययकारी नाट्यांची अथवा आजच्या प्रेक्षकांची. आणि म्हणूनच हे कलावंतही एकाकी आहेत.' अशी जाण असूनही या वर्षातले खानोलकरांचे नाट्यलेखन निराशाजनक झाले आहे. म्हणूनच 'श्रीरंग प्रेमरंग' या 'आविष्कार'च्या प्रयोगाच्या निमित्ताने 'ललित नभि चार मेघ', 'होती एक शारदा', 'प्रेषित' याही नाटकांविषयी लिहिण्याचे ठरविले आहे. (सरकारी नाट्यस्पर्धेत या नाटकांचे प्रयोग प्रथम फेरीतच बाद झाल्याने यापूर्वी त्यांचे परीक्षण झाले नव्हते).

खानोलकरांच्या यंदा रंगमंचावर आलेल्या नाटकांत 'होती एक शारदा' हे उजवे नाटक आहे. शारदेच्या जीवन ा वरील वा यौवनावरील संकट केवळ देवलांच्या काळापुरते खरे नव्हते; त्याचा तपशील बदलला, परंतु शारदेची होलपट चालू राहिली, हा या नाटकाचा अनुभव आहे. नाटक कंपनीतील 'शारदा' नाटकाचा नटसंच, शारदेची भूमिका करणारा पुरुषनट व शारदेच्या भूमिकेसाठी नव्याने कंपनीत आलेली तरुण सुनेत्रा, या तरुण शारदेवर हक्क सांगणारा संस्थानिक, यांच्या सहाय्याने नाटककाराने हा अनुभव रचिला आहे. अनेक चांगल्या शक्यता असणारे हे



'ललित नभी चार मेघ 'मध्ये विजय कारखानीस । सौ. प्रतिभा कुलकर्णी

नाट्यबीज, अप्रस्तुत दुसरा अंक, अत्यंत भडक नाट्यप्रसंग, भास्करचे भावविवश पात्र, यांच्यामुळे विस्कळीत होतो. मात्र रमाकांत देशपांडे यांनी दिग्दर्शित केलेला (फ्रेण्डस् सर्कल, अंधेरी) नाट्यप्रयोग चंदन पेटकर व दत्ता काणे यांच्या अभिनयामुळे स्मरणीय ठरला. प्रफुल्ल अण्णेगिरीची शारदेसाठी केलेली निवड अचूक होती. रमाकांत देशपांडयांच्या दिग्दर्शनात नेहमीप्रमाणे सफाई होती; परंतु नटसंचाने (वर उल्लेखिलेली नावे वजा करता) त्यांना फारशी साथ दिली नाही. हे नाटक पुनर्लेखन करून, संगीताचा पुर्नविचार करून, पुन्हा करण्यासारखे आहे. 'शारदे'चे कथानक व नटांच्या आयुष्यातील संघर्षाचे कथानक या दोन सूत्रांचे परस्परांवर होणारे आरोपन लक्षणीय होऊ शकेल.

'ललित नभी चार मेघ' हे मित्र सहयोग, ठाणे या संस्थेने रंगमंचावर आणलेले नाटक म्हणजे नाटककार स्वत:च्याच कथापद्धतींचे अनुकरण करीत एका विलक्षण गोंधळापर्यंत कसा आला आहे, त्याचे उत्तम उदाहरण आहे.

'ललित नभी चार मेघ' या नाटकातील विश्रामाव काही अलौकिक देणे घेऊन आलेला पुरुष ('कोंडुरा', कादंबरी, 'गुरुमहाराज गुरु', 'प्रषित' ही नाटके हेच सूत्र बाळगतात) काही व्यवहारी, मतलबी माणसांच्या हाती सापडतो. या नाटकात महारोगी आणि राजपुत्र या दोन कल्पनांचा फार चांगला अर्थ नाटककाराला जाणवला होता; परंतु नाट्यरचनेत त्याचा स्वाभाविक विस्तार न होता एखाद्या भडक हिंदी चित्रपट कथेचे स्वरूप त्यास आले आहे. नाट्यरचना एखाद्या नवशिक्या नाटककारासारखी 'गोष्ट सांगणारी', पात्रांच्या आगमन निर्गमनाला काही अर्थ नाही, अशी अत्यंत विस्कळित आहे. खानोलकरी काव्यात्म भाषेचे फुलोरे आणि ही नाटयरचना यांचे काही नाते जुळत नाही. हे नाटक पहात असताना सारखे असे वाटत होते की खानोलकर आपल्याच वाङमयातून काही स्फुट कल्पना उचलून त्या जोडून एखादी गोधडी करीत आहेत. 'नाटक' हे स्वरूप त्या लेखनाला नव्हतेच. एका नाटकाचा आवाका लक्षात न घेता नको तितकी सूत्रे एकत्र करणे, आपल्या अनुभवाचा काव्यात्म स्वभाव लक्षात न घेता भडक घटनाप्रधान रचना करणे, असे खानोलकरी नाटकातील दोष त्यांच्या कल्पकतेवर अन्याय करीत आहेत. स्वतःला स्फुरलेली कोणतीही संकल्पना पुरी फुलू न देताच ते इतस्ततः तिचा वापर करतात. एखाद्या विलक्षण व्यक्तिमत्वाच्या लेखकाच्या साहित्यकृतीत जाणवणारी अनुभवांची आवर्तने वेगळी आणि खानोलकरांसारख्या नाटककाराने बेजबाबदारपणे स्वतःच्या कल्पनांची नाट्यकृतींवर अन्याय करणारी केलेली पुनरावृत्ती वेगळी. यात बळी जातो तो दिग्दर्शकाचा. अशोक साठयांनी 'ललित नभी चार मेघ' हा प्रयोग व विश्रामची भूमिका परिश्रमपूर्वक बसवली होती; मुळात नाटयसंहितेचे संपादनही केले होते; परंतु नाटककाराच्या मनातील गोंधळ प्रयोगातही प्रतिबिंबित झाला होता. हे नाटक 'सेट वर करावे हेही मला जरा खटकले; परंतु याविषयी वेगळा विचार असू शकेल. साठ्यांसारख्या मेहनती, नाट्याचा गंभीर विचार करणाऱ्या दिग्दर्शकाने नाट्यसंहितेची निवड याहून विचक्षपणे करावयास हवी.

'प्रेषित' या नाटकाचा प्रयोग पुण्याच्या 'महाराष्ट्रीय कलोपासक'ने सादर केला. एका अपंग मुलाचे आजोबा गेल्यानंतर त्याला ही वार्ता सांगावी कशी असा प्रश्न इस्पितळातील डॉक्टर, नर्स, त्या मुलाचे आई-वडिल यांना पडतो. त्या मुलाच्या पायातील शक्ती नुकती परत येत असतानाच जर त्याच्या मनाला धक्का बसला तर तो पुन्हा अपंग होईल असे भय सर्वांना वाटते, याचवेळी कॅन्सरचा रोगी असणारा हळदणकर त्या मुलाच्या आजोबांची भूमिका करावयास तयार होतो. भूमिका करता करता तो स्वतःच्या नकळत आजोबा होतो, त्याच्या वेदना नाहीशा

होतात. (या काया प्रवेशाच्या संदर्भात 'प्रेषित' शब्द चुकीचा वाटतो) हे सूत्र मनोवेधक असले तरी खानोलकरांनी लिहिलेले संवाद अनाठायी चर्चा करणारे असल्यामुळे, पात्रांच्या प्रवेशाला काही नियम नसल्यामुळे, तिसऱ्या अंकातील कथाविस्तार अनावश्यक असल्यामुळे, याही नाटकात त्यांनी कथासूत्राला न्याय दिला नाही. आजोबा व हळदणकर या दुहेरी भूमिकेतील वासुदेव पाळंद्यांचा अभिनय, अरविंद भावे या लहान मुलाचा अकृत्रिम अभिनय आणि प्रमिला बेडेकरांची हळदणकरांच्या आईची भूमिका, यामुळे नाटयलेखनातील दोष प्रयोगात सुसह्य झाले. दिग्दर्शक माधव वझे यांनी पात्रांच्या हालचालींच्या संयोजनाकडे मात्र पुरेसे लक्ष दिले नव्हते.

## कोणताच रंग नसणारा 'श्रीरंग–प्रेमरंग'

खानोलकरांनी यंदा लिहिलेल्या नाटकांचे हे चित्र डोळ्यापुढे असताना 'अविष्कार'च्या 'श्रीरंग–प्रेमरग'ला जाताना फार उत्साह नव्हता. परंतु खानोलकर सध्या 'दशावतारी' पद्धतीचे संशोधन करीत आहेत हे माहीत असल्यामुळे त्यांच्या संगीत चमत्कारिक फार्सविषयी उत्सुकता होतीच. प्रत्यक्षात मात्र ना दशावतारी, ना धड संगीत, ना धड फार्स, असे काहीसे रूप डोळ्यासमोर आले. स्वरूपाविषयीचे प्रश्न बाजूला ठेवले तरी विष्णु पृथ्वीवर फिरायला आले असता एका कन्यकेच्या प्रेमात पडतात, परंतु तिच्यासाठी त्यांना 'राजेश खन्ना'सारखे दिसावे, वागावे लागते; मुंबईतील प्रश्नांना तोंड द्यायला देवत्व पुरे पडत नाही आणि प्रियेला आवडते म्हणून बासरी वाजवावी तर राधा धावत येते किंवा समोरची स्त्री भान विसरून गळ्यात हात टाकते; सासरा त्या प्रत्यक्ष विष्णूचा महाराज करू पाहतो; इत्यादी या कथानकात फार्सिकल विनोदही नाही वा देवत्व व मनुष्यत्व यातील अन्वय वा संघर्षही व्यक्त होत नाही. संगीत कोठेही नाटकात मुरलेले नाही.

दिग्दर्शक अरविंद देशपांडे यांनी हे नाटक कल्पकतेने बसविलेले आहे. दशावतारी पडद्यांच्या जागी रेखांकित पडदे वापरण्याची शितुतांची कल्पना परिणामकारक होती. तसेच नारदाने दोन पावले मागे जाऊन (ड्रॉपच्या मागे) मी उड्डाण करतो असे म्हणणे, विष्णु अंतर्धान पावतो हे अभिनयाने सुचविणे, नाटयरूपास अनुकूल वाटले. फक्त शेवटच्याच प्रसंगी अंधार करून विष्णूने धावत जाणे मात्र खटकले.

अनंत वर्तकांच्या रंगभूमीवरील अस्तित्वाला एक मिस्किल प्रसन्नत्व असल्यामुळे ते नारद शोभले. श्रीकांत लागू (विष्णू), अरुण काकडे, प्रदीप प्रधान (तुबर–गरुड) यांनी आपल्या भूमिका समजून वठवल्या. परंतु विद्या आपटे (राधा) आणि सुषमा भेंडे (कल्पना) या दोन्ही अभिनेत्री त्यांच्या सदोष शब्दोच्चारामुळे अत्यंत कृत्रिम वाटल्या. विद्या आपटे गेले काही दिवस

प्रायोगिक रंगमंचावर सातत्याने भूमिका करीत आहेत. तरी त्यांनी आपली दातात शब्द चावण्याची लकब सुधारलेली नाही. ज्या कलावंतांना प्रामाणिकपणे रंगभूमीवर कार्य करायचे आहे त्यांनी आपल्या शरीरयष्टीची आवश्यक काळजी घ्यायला हवी, त्यांच्या संदर्भात ती अनावश्य चैन नाही. हे विद्याबाईंनी ध्यानी घ्यावे. विद्या आपटे व सुषमा भेंडे यांचे गाणे म्हणजे श्रोत्यांवर अन्यायच होता. किंबहुना या नाट्यप्रयोगाची संगीताची बाजू फारच कच्ची होती. त्यामुळे खानोलकरांची अर्थवाही पदरचना प्रेक्षकांपर्यंत पोचलीच नाही.

'दशावतारी' नाट्यरूपाचे संशोधन करणारे खानोलकर, 'एक शून्य बाजीराव' या पहिल्या नाट्यलेखनात लवचिक नाट्यसंहिता निर्माण करणारे खानोलकर, 'श्रीरंग प्रेमरंग'सारखे दिशा नसणारे नाट्यरूप का शोधतात? 'हयवदन'चे भाषांतर करतानाही त्यांना लोकनाट्यावर आजचे नाट्य आरोपित करण्याचे लक्षणीय मार्ग दिसले वा सुचले का नाहीत? किंबहुना ज्या नाटककाराविषयी कोणे एके काळी आपण अपेक्षा बाळगल्या तो नाटककार आज स्वतःच निर्माण केलेल्या भावव्यात गरगरताना पाहून विलक्षण खिन्नता वाटते. या वर्षीच्या खानोलकरी नाटकाचे चित्र कोणाही रसिकाचे मन विषण्ण करील असे आहे.

'अविष्कार'चे सूत्रधार आणि 'श्रीरंग'चे दिग्दर्शक अरविंद देशपांडे यांनी प्रस्तुत नाटक स्वीकारले कसे हा प्रश्न उभा राहतोच. ज्या नाट्यप्रयोगाच्या अपयशालाही मोल आहे असे हे नाटक नाही वा व्यावसायिक यशाने दुसऱ्या एखाद्या प्रयोगाला आर्थिक पाठबळ देईल असेही हे नाटक नाही. मग हा प्रयोग कशासाठी? आज सर्वच दिग्दर्शकांना भारतीय नाट्यपद्धतीच्या शक्यतांचे अन्वेषण व्हावे असे वाटते आहे हे मला माहीत आहे. परंतु ते 'श्रीरंग'सारख्या नाट्यरूपातून होणार नाही हे अरविंद देशपांड्यांना कळायला हवे होते.

आधीच सध्या प्रायोगिक चळवळ मंदावलेली असताना अशा प्रयोगावर सयोजक, नट, प्रेक्षक यांचा वेळ वाया का घालवायचा? एखादाच प्रयोग वर्षात करावयाचा असल्यास नाट्यसंहिता आकांक्षी असणे अत्यावश्यक आहे. त्या संहितेची निवड करताना नाटककाराच्या प्रचलित प्रतिमेकडे न पाहता नाट्यसंहितेच्या रूपाकडे बारकाईने पहाणेही आवश्यक आहे. खानोलकरी नाटकातील प्रायोगिकत्व वा नाट्यरूप पुन्हा एकदा तपासले जाण्याची अत्यंत गरज आहे.

● ● ●

चाललंय हे काही खरं नव्हे, याची तिला जाणीव नव्हे-बोच होती. या काळात तिच्या पडद्यामागच्या एखाद्या छायाचित्राकडे पाहणं हा अक्षरश: Shattering experience होता. एकेकाळीं वाऱ्याच्या मंद झुळकेनी पाण्यावर तरंग उठवावेत तशी भावनांची कारंजी उसळवणारी तिची नजर विलक्षण ताठरलेली दिसायची. चेहऱ्यावरची हास्यरेषा पार लुप्त झाली होती. तशी ती पडद्यावर हसली कमीच हे खरं पण ती हसायची मनापासून-फार फार मनापासून. लौकिकार्थी ३१ मार्च ७२ ला ती निधन पावली. पण तिचं मरण यापूर्वीच केव्हातरी झालं होतं. केव्हा ते सांगते—

मीनाकुमारी

अरुणा अंतरकर
यांचा प्रदीर्घ लेख

**माणूस**
**पुढील अंकी**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संथेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**